CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ | वर्ष – ४ थे | अंक १५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# NDA राज्यसभेत इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर !





**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का बसला आहे. राज्यसभेत राघव चड्ढा , संदीप पाठक यांच्यासह आपच्या ७ खासदारांनी भाजप मध्ये सहभागी होण्याच्या प्रस्ताव–ला राज्यसभेच्या सभापतींनी मंजुरी दिली आहे. याबद्दलचं नोटिफिकेशन राज्यसभेनं जारी केलं आहे. यामध्ये भाजप खासदारांच्या यादीत या ७ नेत्यांच्या नावांचा समावेश आहे. राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे ७ खासदार भाजपमध्ये सहभागी झाल्यानं राज्यसभेतील भाजप खासदारांची संख्या ११३ वर पोहा–चली आहे. यामध्ये राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या ५ खासदारांचा समावेश आहे. राघव चड्ढा, अशोक मित्तल, हरभजन सिंग,संदीप पाठक, विक्रमजीत सिंग साहनी, स्वाती मालीवाल आणि राजेंद्र गुप्ता या आपच्या खासदारांनी कमळ हाती घेतलं आहे. त्यामुळे राज्यसभेतील आपच्या खासदारांची संख्या ३ वर आली आहे.आपनं पंजाबमधून सात जणांना, तर दिल्लीमधून तीन जणांना राज्यसभेवर संधी दिली होती. पंजाबमधून राज्यसभेवर गेलेल्या सातपैकी सहा जणांनी आपची साथ सोडली आहे. संत बलबीर सिंग यांनी मात्र अद्याप पक्ष सोडलेला नाही. सोबतच नारायण दास गुप्ता आणिसंजय सिंहदेखील कठीण काळात पक्षासोबत कायम आहेत. सध्याच्या घडीला राज्यसभेत आपचे केवळ ३ खासदार आहेत. आपच्या ७ खासदारांनी कमळ हाती घेतल्यानं राज्यसभेतील एनडीए तील खासदारांचा आकडा १४८ वर पोहोचला आहे. याचा अर्थ सत्ताधारी एनडीए आता राज्यसभेत दोन तृतीयांश बहुमताच्या आकड्यापासून अवघी काही पावलं दूर आहे. राज्यसभेतील बहुमताचा आकडा १६३ इतका आहे. संविधानातील दुरुस्तीसाठी दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा गरजेचा असतो. त्या दृष्टीनं आपचे ७ खासदार फुटून भाजपच्या गोटात दाखल होणं सत्ताधाऱ्यांसाठी महत्त्वाचं आहे. एनडीएला राज्यसभेत आतापर्यंत कधीही दोन तृतीयांश बहुमत मिळवता आलेलं नाही. त्यामुळे एनडीए इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर आहे. राज्यसभेतील सदस्य संख्या वाढवण्यासाठी भाजपचे प्रयत्न सुरु आहेत. या वर्षीच्या अखे–रीस राज्यसभेच्या ३० जागा रिक्त होत आहेत. सत्ताधारी पक्षाकडे असलेलं संख्याबळ पाहता राज्यसभेच्या निवडणुकीत भाजप ५ जागा जास्त जिंकेल. त्यामुळे सत्ताधारी एनडीएचा आकडा दोन तृतीयांश बहुमताच्या अधिक जवळ जाईल.

# भारत –रशियामध्ये मोठा संरक्षण करार




**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** भारत आणि रशिया या दोन देशांतील मैत्रीपूर्ण संबंध संपूर्ण जगाला माहित आहे. जगाचा विरोध धुडकावत कधी भारत रशियासाठी तर कधी रशिया भारतासाठी संकटाच्या काळात भक्कम उभा राहिला आहे. आखाती देशात सध्या तणाव आहे. होर्मुज खाडी इराण आणि अमेरिका युद्धामुळे बंद आहे. होर्मुज खाडी बंद असल्याने तेलाची समस्या आहे. जगात अनेक ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. अशातच रशिया आणि भारताने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने भारताच्या आजूबाजूच्या देशांची चांगलीच जळजळ होणार आहे.मिळालेल्या माहितीनुसार, भारत आणि रशियाने एका मोठ्या संरक्षण करारावर सह्या केल्या. या कराराअंतर्गत रशिया भारताला लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे पुरवणार आहे. या कराराची अद्याप अधिकृत घोषणा झाली पण करार जवळपास झाला असल्याची माहिती आहे. या कराराला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. या करारामध्ये रशिया भारताला ठ–३७ च् क्षेपणास्त्र देणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारताला चीन आणि पाकिस्तानविरोधात लढण्यासाठी या क्षेत्रपास्त्राचा अत्यंत मोठा फायदा होऊ शकतो.

ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानमधून भार–तावर मोठे बॉम्ब टाकले जात होते. यावेळी रशियन बनावटीचे क्षेपणास्त्र हवेतच पाकिस्तानचे हे बॉम्ब निकामी करत होते. भारताने ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारताची लष्करी ताकद जगाला दाखवली. रशियन माध्यमांनुसार, ठ–३७ च् हे सर्वाधिक पल्ल्याच्या हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांपैकी एक आहे. त्याचा वेग अंदाजे ३००–४०० किमी आहे.या क्षेपणास्त्राचा वापर हवाई पूर्व सूचना आणि इंधनवाहू विमानांद्वारे, शत्रूच्या जेट विमानांना अत्यंत अचूकतेने टार्गेट करते. भारताची लष्करी ताकद मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. गेल्या काही दिवसांपासून रशिया आणि भारत मोठ्या प्रमाणात लष्करी करार करत आहेत. रशियाचे अध्यक्ष पुतिन देखील भारत दौऱ्यावर लवकरच येणार आहेत.

# आता थेट भाजपच्या शपथविधी सोहळ्यालाच येणार : पंतप्रधान



**वृत्तसंस्था**

**बॅरकपूर :** पश्रि्चम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राजकीय वातावरण शिगेला पोहोचले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर २४ परगना जिल्ह्यातील बॅरकपूर येथे 'विजय संकल्प' रॅलीला संबोधित केले. या निवडणुकीतील ही माझी शेवटची सभा असून, आता मी थेट भाजपच्या शपथविधी सोहळ्यालाच उपस्थित रा–हणार आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी विजयाचा ठाम विश्र्वास व्यक्त केला.सभेच्या सुरुवातीलाच पंतप्रधान मोदींनी जनसमुदायाचा उत्साह पाहून बंगालमधील बदलाचे संकेत दिले. ते म्हणाले की, बॅरकपूरची ही पावन भूमी परिवर्तनाच्या लाटेला मार्ग मोकळा करत आहे. बंगालमध्ये मी जिथे जिथे गेलो, तिथे या कडाक्याच्या उन्हातही जनतेचा असा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. ४ मे रोजी लागणाऱ्या निकालानंतर भाजपच्या शपथविधी सोहळ्यासाठी मला पुन्हा यावेच लागेल, याची आता मला पूर्ण खात्री पटली आहे, असे मोदींनी नमूद केले.हेलिपॅडपासून सभास्थळापर्यंतच्या दोन किलोमीटरच्या प्रवासात झालेल्या गर्दीचा उल्लेख करत पंतप्रधान भावूक झाले. एवढ्या सकाळी हजारो लोक मला आशीर्वाद देण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभे होते, याची मी कल्पनाही केली नव्हती. घर सोडल्यापासून तुमच्यामध्ये राहूनच मला सुख आणि समाधान लाभले आहे, तुम्हीच माझे कुटुंब आहात. गेल्या तीन–चार दशकांपासून मी देशाच्या कानाकोपऱ्यात फिरत आहे. पक्षाने कार्यकर्ता म्हणून दिलेली प्रत्येक जबाबदारी मी पार पाडली असून, ही निवडणूक प्रक्रियाही त्याचाच एक भाग आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.जानेवारी २०२४ मध्ये अयोध्येत झालेल्या रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा संदर्भ देत मोदी म्हणाले की, त्यावेळी मी ११ दिवसांचे जे अनुष्ठान केले होते, तशीच काहीशी अनुभूती मला या निवडणुकीत येत आहे. एखाद्या देवीच्या मंदिरात गेल्यावर जी सात्विक भावना मनात असते, तसाच अनुभव मला बंगालमध्ये येत आहे. हे केवळ माझे बंगा–लप्रती असलेल्या अफाट प्रेमामुळेच शक्य झाले आहे.भारताच्या प्राचीन समृद्धीचा दाखला देत पंतप्रधान म्हणाले की, प्राचीन काळी भारताच्या वैभवाचे अंग (बिहार), बंग (बंगाल) आणि कलिंग (ओडिशा) हे तीन मुख्य स्तंभ होते. जेव्हा हे स्तंभ कमकुवत झाले, तेव्हा देशाच्या सामर्थ्याला धक्का बसला. आज जेव्हा भारत विकसित होण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करत आहे, तेव्हा अंग, बंग आणि कलिंगाचे सक्षमीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. भारताचा भाग्योदय हा 'पूर्वोदया'शिवाय अपूर्ण आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम' हा गुलामीतून मुक्तीचा मंत्र ठरला होता, याची आठवण करून देत पंतप्रधानांनी २१ व्या शतकात या मंत्राला बंगालच्या नवनिर्माणाचा आधार बनवण्याचे आ–वाहन केले. बंगालची सेवा करणे, येथील सुर–क्षा अबाधित राखणे आणि बंगालपुढील मोठ्या आव्हानांचा सामना करणे, हे माझे भाग्य आणि कर्तव्य दोन्ही आहे. या कर्तव्यापासून मी कदापि मागे हटणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य : प्रताप सरनाईक





**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** सध्या महाराष्ट्रामध्ये मराठी सक्तीचा विषय खूप चर्चेत आला आहे. त्यामुळे सध्या राज्यातील वातावरण तापलेले आहे. १ मेपासून सर्व अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना व्यवसाय करताना मराठी भाषा बोल–ावी लागणार आहे, असा निर्णय राज्याच्या परिवहन विभागाने घेतला आहे. या निर्णयाविरोधात आता राज्यातील परभाषिक रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी मोर्चा उघडला असून ४ मे रोजी त्यांनी संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर आज राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुंबई आणि मुंबईलगतच्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या संघटनांच्या शिष्टमंडळांबरोबर चर्चा केली आहे. या बैठकीनंतर त्यांनी राज्य सरकारची भूमिका माध्यमांसमोर स्पष्ट केली आहे.

प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले की, आम्ही बैठकीचे आमंत्रण देतानाही सांगितले होते की, रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य आहे. ही राज्य सरकारची भूमिका आहे. तुम्ही या भूमिकेशी सहमत आहात का? त्यांनी यावेळी सहमती दर्शवली. प्रवासी मागे बसतो तेव्हा कुठे जायचे आहे, पैसे किती झाले, इतकी जुजबी मराठी तरी यायला हवी.

दरम्यान, या बैठकीमध्ये विविध संघटनांनी मराठी शिकण्यासाठी मुदत मागितली आहे. तीन महिने, सहा महिने ते एक वर्ष अशा विविध स्वरूपाच्या मागण्या यावेळी संघटनांनी केल्या. या संघटनांसोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. परिवहन मंत्री म्हणून मी भूमिका स्पष्ट केली आहे. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असल्यास जुजबी मराठी येणे गरजेचे आहे, या भूमिकेला सर्वांनी समर्थन दिले आहे, असे यावेळी प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# पाणीपुरी खाल्ल्याने एकाचा मृत्यू; ६० जणांची प्रकृती बिघडली





**वृत्तसंस्था**

**रांची :** बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ल्यामुळे एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना पाणीपुरी खाल्ल्यानं ६ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. तर ६० जण आजारी पडले आहेत. यात लहान मुलांची संख्या अधिक आहे. या सगळ्यांना ताप, पोटदुखी, अतिसार आणि उलट्यांचा त्रास होत आहे. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आ–हेत. ही दुर्दैवी घटना झारखंडच्या गिरीडीहमध्ये घडली आहे. मुफस्सिल पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या बाजतो गावात शनिवारी हा प्रकार घडला. प्रशासन आणि आरोग्य विभागानं या प्रकरणातविषबाधेचासंशय आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, आज–ारी पडलेल्या सगळ्यांनी एकाच विक्रेत्याकडून पाणीपुरी खाल्ली होती. हा विक्रेता घरोघरी जाऊन पाणीपुरी विकत होता. शनिवारी संध्याकाळी पाणीपुरी खाल्ल्यावर रात्रीच्या सुमारास अनेकांची प्रकृती बिघडली. रविवारी सकाळपर्यंत तब्येत जास्त खालावली. अनेकांना ताप आला. पोटदुखीची समस्या आणखी वाढली. यानंतर सगळ्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं.रुग्णालयात उपच–ार सुरु असताना ६ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. यानंतर त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. संपूर्ण गा–वावर एकच शोककळा पस–रली. पाणीपुरी खाल्ल्यानं आजारी पडलेल्यांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आ–हेत. डॉक्टर त्यांच्या प्रकृतीवर बारकाईनं लक्ष ठेवून आहेत. स्थानिक पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी रुग्णालयाचा दौरा करत परिस्थितीचा आढावा घेतला. रुग्णांशी संवाद साधला. उपचार व्यवस्थांचा आढावा घेत तप–ासाचे आदेश दिले. पाणीप–ुरीतून विषबाधा झाल्याचा संशय अधिकाऱ्यांना आहे. पाणीपुरी विकणारा पालमोचा रहिवासी आहे. अनेकांची प्रकृती बिघडल्याचं समजताच तो फरार झाला. त्याचा शोध सुरु आहे. सुदैवानं रुग्णांची प्रकृती स्थिर आहे.

# अमेरिकेला इराणशी पंगा नडला; लष्करी तळांच्या दुरुस्तीला ४१ हजार कोटी खर्च येणार



**वॉशिंग्टन :** इराण आणि अमेरिका यांच्यातील पश्रि्चम आशियातील युद्धात अमेरिकेने केवळ इराणचे नुकसान केले नाही, तर इराणनेही अमेरिकेला मोठा धक्का दिला आहे. एनबीसी न्यूजच्या वृत्तानुसार, इराणने अमेरिकेच्या ११ लष्करी तळांवर हल्ला केला, त्यामुळे अंदाजे ५ अब्ज डॉलर्सचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.यामध्ये कुवेत, संयुक्त अरब अमिरात आणि सौदी अरेबियासारख्या देशांमधील तळांचा समावेश आहे. या तळांच्या दुरुस्तीसाठी ४१ हजार कोटींचा खर्च येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

अमेरिकन अधिकारी आणि काँग्रेसच्या सहाय्यकांशी केलेल्या मुलाखतींवर आधारित नवीन अहवालानुसार, मध्य पूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांचे अलीकडील इराणी हल्ल्यांमुळे 'व्यापक नुकसान' झाले आहे जे नुकसान 'सार्वजनिकरित्या मान्य करण्यात आले आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक गंभीर' दिसत आहे. पश्रि्चम आशियातील तणावाच्या पार्श्र्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी मोठी डोकेदुखी ठरेल असे चित्र समोर आले आहे. इराणच्या हल्ल्यांमुळे पश्रि्चम आशियातील अमेरिकेच्या लष्करी तळांचे मोठे नुकसान झाल्याचे अलीकडच्या एका अहवालातून समोर आले आहे.

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर हल्ला चढवला ज्याच्या प्रत्युत्तरात इराणने देखील मध्यपूर्वेतील अमेरिकी सैन्याच्या टाळणं लक्ष्य केले, परिणामी झालेल्या नुकसानीच्या दुरुस्तीसाठी अमेरिकेला अब्जावधी डॉलर्सचा खर्च येऊ शकतो. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष हानी अमेरिकेने पूर्वी मान्य केलेल्या नुकसानीपेक्षा खूपच जास्त आहे.

एनबीसी न्यूजच्या अहवालानुसार सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हवाल्याने इराणने पश्रि्चम आशियातील सात देशांमध्ये पसरलेल्या किमान ११ अमेरिकी लष्करी तळांना लक्ष्य केले. इराणने एकूण १०० वेगवेगळ्या लक्ष्यांवर हल्ला केला आणि या तळांच्या दुरुस्तीसाठी अंदाजे ५ अब्ज डॉलर्स, सुमारे ४१००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च होऊ शकतो. यामध्ये रडार प्रणाली, महागडी शस्त्रे आणि नष्ट झालेल्या विमानांच्या दुरुस्तीचा खर्च नाही तर, यांचा देखील समावेश केल्यास दुरुस्ती खर्चाचा आकडा खूप जास्त होईल. इराणने मध्य–पूर्वेतील कुवैत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, जॉर्डन आणि बहरीन या ७ देशांमधील अमेरिकेच्या तळांवर हल्ला केला. तेथील अमेरिकेच्या हवाई दल, नौदल आणि लष्कराच्या तळांना नेमके लक्ष्य करण्यात आले होते. त्याचवेळी, इराणने हल्ल्यात केवळ कुवैत आणि युएईच नव्हे तर सौदी अरेबियाचा प्रिन्स सुलतान हवाई तळ, जॉर्डनचा मुवफ्फक साल्टी हवाई तळ आणि बहरीनमधील अमेरिकेच्या नौदलाच्या पाचव्या ताफ्याच्या मुख्यालयालाही लक्ष्य केले.

याव्यतिरिक्त इराणने संयुक्त अरब अमिरातीमधील (ण–ए) अल धाफ्रा हवाई तळ आणि अल रुवैस लष्करी तळांवरही हल्ला केला. इंधन साठवण सुविधा, वैद्यकीय दवाखाने, विमान हँगर्स आणि लष्करी निवासस्थानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

## सेन्सेक्स–निफ्टीमध्ये वाढ

**मुंबई :** पश्चिम आशियातील तणाव संपवण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता चर्चेची दुसरी फेरी सुरू होण्याच्या आशेने आज जगभरातील बाजारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शांतता चर्चेच्या आशेमुळे देशांतर्गत शेअर बाज–ारानेही सुरुवातीच्या व्यवहारात तेजीचा कल कायम ठेवला आहे. आजच्या व्यवहाराची सुरुवातही दमदार झाली. बाजार उघडल्यानंतर लगेचच, नफावसुलीमुळे थोडी विक्री झाली, परंतु काही वेळानंतर खरेदीदारांनी पुन्हा बाजारात आपली ताकद प्रस्थापित केली. खरेदीच्या पाठिंब्याने सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांक तेजीच्या दिशेने वाटचाल करू लागले. व्यवहाराच्या पहिल्या तासानंतर, सेन्सेक्स ०.७८ टक्क्यांच्या आणि निफ्टी ०.७७ टक्क्यांच्या वाढीसह व्यवहार करत होता.

## वृद्ध महिलेला गंडवले

सातारा : मॉर्निंग वॉकला गेलेल्या वृद्ध महिलेच्या सव्वा लाख रुपये किंमतीच्या सोन्याच्या बांगड्या दोन भामट्यांनी पोलीस असल्याचे सांगून लंपास केल्याची घटना फलटण शहरात घडली आहे. शोभा खलाटे, असे फसवणूक झालेल्या वृद्धेचे नाव असून फलटणचे आमदार सचिन पाटील यांच्या बंगल्यासमोरच हा प्रकार घडल्याने फलटण शहर पोलिसांची मोठी खळबळ उडाली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे फलटण पो–लीस संशयितांचा शोध घेत आहेत.

## कुंटणखान्यावर छापा

**पुणे :** पुण्यातील बुधवार पेठ परिसरात सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायावर फरासखाना पोलिसांनी मोठी कारवाई करत चार फ्लॅट तब्बल एक वर्षासाठी सील केले आ–हेत. याच कारवाईदरम्यान भार–तात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या तीन बांगलादेशी महिलांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेमुळे शहरातील रेड लाईट एरियामध्ये खळबळ उडाली आहे.

## धावती स्कॉर्पिओ पेटली

**नाशिक :** नेहमीच अपघातांच्या बातम्यांमुळे चर्चेत राहणाऱ्या समृद्धी महामार्गावर गुरुवारी पहाटे एक भीषण घटना घडली. नाशिकहून कोलकात्याकडे जाणारी एक स्कॉर्पिओ गाडी धावतानाच आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. सुदैवाने, त्याच वेळी मुंबईहून छत्रपती संभाजीनगरकडे परतणारे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने यंत्रणा हलवल्यामुळे मोठी जीवितहानी टळली आहे.

## ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश

**पुणे :** पुणे शहराच्या पूर्व भागात अमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांनी मोठी मोहीम राबवत वाघोली, लोणीकंद आणि खराडी परिसरातील ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. मागील महिनाभर सुरू असलेल्या या कारवाईत आतापर्यंत १३ गुन्हे दाखल करण्यात आले असून १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

## लिफ्ट कोसळली

**नाशिक :** नाशिकच्या मेडिकल कॉलेजमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या अंगावर लिफ्ट कोसळल्याची घटना घडली आहे. मेडिकल कॉलेजमधील महिला कर्मचारी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर उपचार सुरू आहेत. ज्योती अहिरे असं जखमी महिलेचं नाव आहे. मेडिकल कॉलेज प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती मिळाली नाही. आडगाव पोलिसांकडून या घटनेसंदर्भात चौकशी सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फर्दापूर परिसरात रब्बी मका चांगल्याप्रकारे आल्या मात्र शेतकरी यांना भाव कमी भेटत आहे



**फर्दापूर दि 26 |** फर्दापूर परिसरात यंदा रब्बी मका चांगल्याप्रकारे आल्या आहेत तरी शेती तयार करण्यासाठी मका काढण्यात व्यस्त आहे परंतु मका पिकाला कमी भाव मिळत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे .

## फुल एआय कलर टच पॅनेलसह एफ 11 वॉशिंग मशीन लाँच

मुंबई : सलग १७ वर्षांपासून जगातील नंबर १ मेजर अप्लायन्स ब्रँड असलेल्या हेयर अप्लायन्सेस इंडियाने आपल्या नव्या हेयर ,एफ 11 वॉशिंग मशीन मालिकेच्या लाँचसह लाँड्री इनोव्हेशनला नव्या उंचीवर नेले आहे. कपड्यांचा दुर्गंध, डिटर्जंटचा अपव्यय आणि गुंतागुंतीच्या नियंत्रणांसारख्या रोजच्या समस्यांवर मात करण्यासाठी डिझाइन केलेले हेयर ,एफ11 — भारतातील एकमेव अल्ट्रा फ्रेश एअर टेक्नॉलॉजी आणि एआय टच पॅनेलसह — आधुनिक भारतीय घरांमध्ये लाँड्रीसाठी अतुलनीय ताजेपणा, स्वच्छता आणि काळजी घेऊन येते.

## भागूबाई – हसवणाऱ्या गप्पांमधून उलगडणारं सत्य

आजच्या धावपळीच्या आणि सतत बदलत जाणाऱ्या जीवनात गाव, माणसं आणि नात्यांचं रूपही हळूहळू बदलत चाललं आहे. एकेकाळी गावच्या चौकात रंगणाऱ्या गप्पा, कुचाळक्या आणि एकमेकांच्या आयुष्यात डोकावणं हे फक्त वेळ घालवण्याचं साधन नव्हतं, तर त्यातूनच नात्यांची वीण घट्ट होत असे. पण या गप्पांच्या आड किती सत्य दडलेलं असतं, याचा विचार आपण क्वचितच करतो. हाच मुद्दा अगदी सहज आणि वास्तववादी पद्धतीने ‘भागूबाई’ या चित्रपटातून मांडला आहे. गावातल्या गप्पा आणि कुचाळक्या करण्यात रमलेली एक बाई — भागूबाई. तिच्या बोलण्यामुळे संपूर्ण गावात खळबळ उडते. लोकांची गुपितं उघड करताना ती नकळत अनेकांच्या आयुष्यात हस्तक्षेप करते. पण जेव्हा तिची ही बोलतीच बंद केली जाते, तेव्हा खरी कथा सुरू होते. आणि इथेच एक महत्त्वाची गोष्ट समोर येते — गावाला जोडून ठेवणारा धागा अफवा नव्हत्या, तर आतापर्यंत दडलेलं सत्य होतं.

## मायोपिया नियंत्रित करण्यासाठी 'एसीलोर स्टेलेस्ट' चष्मा लेन्स

नवी दिल्ली – गेल्या वर्षाच्या उत्तरार्धात, एसीलोर लक्सोटिकाने जाहीर केले की, अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने त्यांच्या 'एसीलोर स्टेलेस्ट' लेन्सला 'डी नोव्हो' मार्गाद्वारे बाजारपेठेत विक्रीसाठी अधिकृत मान्यता दिली आहे. यापूर्वी 2021 मध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने या उत्पादनाला 'ब्रेकथ्रू टेक्नॉलॉजी' (महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान) म्हणून दिलेल्या मान्यतेनंतरचा हा पुढचा टप्पा आहे. एसीलोर स्टेलेस्ट ही मुलांमधील मायोपियाचा वेग कमी करण्यासाठी अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाकडून बाजारपेठ मान्यता मिळालेली पहिली आणि एकमेव चष्मा लेन्स आहे. या लेन्सची परिणामकारकता क्लिनिकल डेटाद्वारे सिद्ध झाली असून, यामुळे दोन वर्षांच्या कालावधीत मुलांमधील मायोपिया वाढण्याचा वेग सरासरी 71% ने मंदावल्याचे दिसून आले आहे.

## शकुनिच्या तीक्ष्ण बुद्धी आणि बहुपेडी व्यक्तिमत्त्वाला जिवंत केले

सोनी सब आपल्या नव्या भव्य अध्यायासह हस्तिनापुर के वीर सादर करत आहे. महाभारताच्या पांडव आणि कौरवांच्या अनकथित बालपणावर आधारित ही मालिका नाती, निष्ठा आणि नियती कशी आकार घेतात याचा शोध घेते. या कथेला धार देणारा महत्त्वाचा पैलू म्हणजे चंदन आनंदचा शकुनी एक असा पात्र ज्याची उपस्थिती शांतपणे घटनांचा प्रवाह बदलते, जगाला त्याचा मोठा खेळ दिसण्याआधीच.

## महावीर पाटणी यांना ‘कोरोना योद्धा राष्ट्रीय पुरस्कार’




छत्रपती संभाजीनगर येथील प्रतिष्ठित समाजसेवक महावीर पाटणी यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल “कोरोना योद्धा राष्ट्रीय पुरस्कार” प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान “श्री चिन्मयसागर चॅरिटेबल ट्रस्ट” आणि “वर्ल्ड जैन डॉक्टर्स फोरम” यांच्या वतीने देण्यात आला असून, त्यांच्या निस्वार्थ सेवाभाव आणि मानवतावादी कार्याची दखल घेणारा आहे।

कोरोना महामारीच्या कठीण काळात, जेव्हा संपूर्ण देश भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणात होता, तेव्हा महावीर पाटणी समाजासाठी एक मजबूत आधार बनून उभे राहिले। स्वतःच्या सुरक्षिततेची पर्वा न करता त्यांनी गरजूंना मदत, आरोग्य सेवांमध्ये सहकार्य आणि सामाजिक पाठबळ देत अनेक लोकांपर्यंत मदत पोहोचवली।

खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतचे अध्यक्ष म्हणून त्यांनी समाजाला एकत्रित करत सेवा उपक्रमांना नवी दिशा दिली। त्यांच्या नेतृत्वाखाली विविध मदतकार्य राबवण्यात आले, ज्याचा फायदा समाजातील अनेक घटकांना झाला।

हा पुरस्कार केवळ एक सन्मान नसून, संकटाच्या काळात त्यांनी दिलेल्या मदतीमुळे मिळालेल्या असंख्य आशीर्वादांचे प्रतीक आहे। त्यांचे कार्य आज समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, विशेषतः युवकांना समाजसेवेकडे वळण्यासाठी प्रोत्साहित करत आहे।

या यशाबद्दल संपूर्ण शहरात आनंदाचे वातावरण असून विविध सामाजिक संस्थांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे। महावीर पाटणी यांचा हा सन्मान छत्रपती संभाजीनगरसाठीही अभिमानाची बाब ठरली आहे। यावेळी सकल मारवाड़ी महसभेचे डॉ पुरुषोत्तम दरक डॉ सन्मति ठोले सौ किरण पाटणी आदिची उपस्थित होती अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली आहे

# महावितरण भराडी येथे शेतकऱ्यांची आढावा बैठक



या बैठकीमध्ये भराडी सर्कलमधील व पंचायत कृषीतील शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्या व अनेक गावांमध्ये सिंगल फ्युज व डीपी बसने शेतकऱ्याचे मोडलेले पोल नवीन टाकण्यात यावे लटकलेले तार सरळ करणे तसेच शेतकऱ्यांना दिवसा लाईट देणे अशा अनेक समस्या

शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यासमोर समस्या मांडल्या बैठकीसाठी शेतकऱ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती या बैठकीसाठी महावितरण कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता श्री प्रदीप काळे साहेबांची उपस्थिती होती व अभियंता सहाय्यक शाखा भराडी श्री मनोज सोनवणे व संपूर्ण लाईनमन यांची पण उपस्थिती होती सर्व शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून अभियंता साहेबांनी एका महिन्याच्या आत कामी मार्गे लावण्यात येतील असे लेखी स्वरूपात असे आश्वासन दिले यावेळी जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण माधराव काकडे, पंचायत समिती सदस्य नारायण शिवाजी खोमणे भराडीचे माजी सरपंच रघुनाथ पांडव, गणेश राकडे माजी सरपंच कासोद, पंढरीनाथ चाथे माझी सरपंच वडोद चाथा ,संतोष भाऊ पुंगळे ,काकासाहेब चाथे गजानन भाऊ , दादाराव पांढरे संतोष काकडे ,विजू काकडे, पवन भागवत ,प्रकाश माहूर काकासाहेब महाकाळ , संजय काकडे भगवान, काकडे भागवत काकडे, साहेबराव खोमणे, सुरेश शेळके, गोविंद शेळके, गणेश शिरसाट,व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# गोमाता रक्षणासाठी पैठणला भव्य मोर्चा




तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- दक्षिण काशीतील पैठण येथे पैठण तालुका गोमाता रक्षण संघटनेच्या वतीने खंडोबा चौकापासून ते तहसील कार्यालयापर्यंत गोमाता संरक्षण जागर मोर्चा श्री संत एकनाथ महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या वारकऱ्यांच्या टाळ मृदंगात काढण्यात येऊन नायब तहसिलदार राहुल बनसोडे यांना निवेदन देण्यात आले.

गो तसेच गो वंश हत्या झालीच पाहिजे, गो हत्या करणाऱ्यावर मोक्का कायदा अंनतर्गत कारवाई व्हावी,गोमाता,गाईला राष्ट्रीय दर्जा दिला गेला पाहिजे,प्रत्येक वर्षी गोपुजन उत्सव शासनाने प्रत्येक कार्यालयात साजरा केला पाहिजे अश्या अनेक मागण्या यावेळी करण्यात आल्या गोसेवक शिवराज पारीख, विशाल खर्गे,परमेश्वर नलावडे, संतोष तोतला,राजु लोहिया, अँड नरेश मानधने, अँड मयुरेश औटे , काकासाहेब कदम, बिबीचंद्र पठाडे, एकनाथ कदम, अशोक चांडक, सुरेश मानधने, सामाजिक कार्यकर्ते दिनेश पारीख,रखमाजी महाराज नवले,राहुल पगारे, प्रसाद खिस्ती, दिपक लखमले,कमलेश देशपांडे आदींसाह यावेळी शेकडो गो पालक उपस्थित होती.

# सोयगाव तालुक्यातील जंगला गावाजवळ कंटेनर उलटला, सुदैवाने जीवितहानी टळली



तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.२७ एप्रिल

सोयगाव तालुक्यातील जंगला गावाजवळ दि.२७ सोमवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास मीठ घेऊन जाणारा कंटेनर उलटल्याची घटना घडली असून सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत सविस्तर माहिती अशी,गुजरात येथून दांडी मीठ भरलेला एम.एच.२१ बी.एच.१७१९ क्रमांकाचा कंटेनर चालक दिनेश चव्हाण रा.शिंदखेडराजा जि.बुलढाणा व परमेश्वर पवार रा.भवानी पांगरी ता.बदनापूर हे फर्दापूर कडून सोयगाव येथे दांडी मीठ पोहच करण्यासाठी सोयगाव कडे जात असतांना जंगला गावाजवळ वळणावर कंटेनर चा हुक तुटल्याने मिठाने भरलेला कंटेनर वळणावर उलटल्याची घटना सोमवारी सकाळी घडली तर कंटेनर चा पुढचा भाग पुढे जंगला गावाच्या बाजूला गेल्याने सुदैवाने या अपघातात चालक व क्लिनर बचावले आहे. घटनास्थळावर दांडी मीठ गोण्याचा सडा पडला आहे. दरम्यान सोयगाव - फर्दापूर हा रस्ता नेहमी वर्दळीचा असतो. परंतु अपघात सकाळी घडल्याने मोठी हानी टळली.घटनेची माहिती मिळताच अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष पत्रकार दिलीप शिंदे व योगेश बोखारे यांनी घटनास्थळी धाव घेत चालक व क्लिनर यांची विचारपूस केली.

## मनसेच्या पैठण तालुका पदाधिकाऱ्यांची बैठक उत्साहात; पक्ष बळकटीसाठी निर्धार



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि २७ |** एप्रिल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पैठण तालुका पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली असून, पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जोरदार तयारी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने तसेच मनसे नेते व माजी गृहराज्यमंत्री बाळा नांदगावकर यांच्या सूचनेनुसार दि.२४ एप्रिल रोजी पैठण तालुक्यातील बिडकीन येथे ही बैठक पार पडली. बैठकीत पक्षाची विचारधारा अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सखोल चर्चा करण्यात आली.नवनियुक्त जिल्हा संपर्क अध्यक्ष दिलीप चितलांगे व बिपीन नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत, पक्षप्रमुखांच्या विचारांचा प्रसार गावागावात आणि घराघरात करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले.तसेच स्थानिक प्रश्नांवर मनसे आक्रमक भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट करत जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र सैनिकांनी पुढाकार घ्यावा, असेही सांगण्यात आले.आगामी निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला.नवीन कार्यकर्ते जोडणे, शाखा विस्तार करणे, तसेच स्थानिक पातळीवर जनतेशी थेट संवाद वाढवण्याच्या दृष्टीने ठोस नियोजन करण्यात आले.या बैठकीचे आयोजन मनोज मूरदारे यांनी केले होते.बैठकीदरम्यान तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक समस्यांवर आपली मते मांडत संघटनात्मक मुद्द्यांवर चर्चा केली.

यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव राहुल पाटील, वाहतूक सेना राज्य उपाध्यक्ष मनीष जोगदंडे, पैठण शहराध्यक्ष नितीन शेळके , जिल्हा सचिव भगवान खाटीक , तालुका उपाध्यक्ष नवनाथ चौधरी, बिडकीन शहर अध्यक्ष अक्षय लोणकर, उपशहराध्यक्ष राकेश ढालकरी यांच्यासह तालुक्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मॅक्स करो, रिलॅक्स करो’,

मुंबई : : जेके सिमेंटचा संपन्न वारसा आणि उत्कृष्टता जपणाऱ्या जेके मॅक्स पेंट्सतर्फे नुकतीच ‘मॅक्स करो, रिलॅक्स करो’ ही त्यांची नवी जाहिरात सादर करण्यात आली. या ब्रँडचे अम्बेसेडर अक्षय कुमार पहिल्यांदाच या जाहिरातीत दिसणार आहेत. या बॉलिवुड सुपरस्टारसोबतच्या सहकार्यातून ब्रँडच्या प्रगतीच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली आहे. जेके वॉलमॅक्स या त्यांच्या मुख्य उत्पादनाच्या यशाने तयार केलेल्या भक्कम पार्श्वभूमीवर हे उत्पादन सादर झाले आहे. लोकांना आपलेसे वाटणारे आणि त्यांना आकर्षित करणारे भाष्य असणाऱ्या या जाहिरातीत ब्रँडची मूळ तत्वे सहजपणे प्रतित झाली आहेत.

### उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-62

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

दिनांक 06-04-2026

अर्जदार ०:- उत्तम फकीरराव नवले रा. पिशोर ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विपयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या नातूचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा नातू संदीप ईश्वर नवले चा जन्म दिनांक 15-04-2009 रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या नातू चा जन्म दिनांक 15-04-2009 रोजी पिशोर ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेम सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा नातू संदीप ईश्वर नवले यांचा जन्म दिनांक 15-04-2009 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्याग त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 03-06-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 15-04-2009 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../04/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

जाक्र 2026/संकीर्ण/जमृअ/सीआर-49/कावि-03 — दिनांक २०/५/2026

**-: जाहीर प्रगटन**

अर्जदारः श्री. श्रीमती. रंगनाथ सुकदेव भालेराव रा. नारळीबाग परिसर, सोयगांव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

उपनिबंधक, जन्म-मृत्य नोंदणी विभाग. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम 1969 सुधारीत अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. रंगनाथ सुकदेव भालेराव, रा. नारळीबाग परिसर, सोयगांव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दि. 05.01.2026

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम 1969 चे सुधारीत अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे, धनश्री रंगनाथ भालेराव यांचा दिनांक 20.07.2024 रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. रंगनाथ सुकदेव भालेराव यांचे मुलगी नामे, धनश्री रंगनाथ भालेराव यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे सिया मुलगी नामे, धनश्री रंगनाथ भालेराव यांचा दिनांक 20.07.2024 रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन 30 दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप / हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर । आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक 204/2026 रोजी देण्यात आले.

दिनांक: 26/4/2026

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर करीता

## सोयगावातील अरूण सोहणी यांनी गिरीश महाजन यांना निवेदन दिले



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ एप्रिल

सोयगाव तालुक्यातील सोनसवाडी शिवार पोखरा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना या योजनेत समाविष्ट करून मिळण्याबाबत चे निवेदन वरील विषयी अनुसरण विनंतीपूर्वक निवेदन दिले.सोयगाव तालुक्यातील सोनसवाडी शिवार नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समावेश यादीत समाविष्ट करण्यात आलेले होते. परंतु सोनसवाडी शिवार सोयगाव नगरपंचायत हद्दीमध्ये येत असल्याचे कारण देत नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतून वगळण्यात येत असून या शहरातील शेतकऱ्यांना कुठल्याही योजनेचा ना महाडीबीटी किंवा पोखरा योजनेचा लाभ घेता येत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होत असून शेतकरी शेतीसंबंधीत योजनेपासून वंचित राहत आहेत.यामुळे याशिवाराचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समाविष्ट करून शेतकऱ्यांना या योजनेतील विविध शेती उपयोगी उपयोगी योजनांचा लाभ मिळावा असे निवेदन कृषीभूषण शेतकरी अरूण श्रीराम सोहणी यांनी दिले.त्या निवेदनावर खालील प्रमाने शेतकऱ्यांचे स्वाक्षऱ्या आहेत.अरुण सोहनी,कैलास आगे,गजानन देसाई,प्रकाश सोहणी,विकास देसाई, रमेश सोहणी,रामलिंग आप्पा कुलेँकर,सुरेश आगे,कृष्णा कुलेँकर,प्रकाश ढगे,कडूबा ढगे,विठ्ठल ढगे सह शेतकरी उपस्थित होते.

## कृषी सेवा केंद्र चालकांनी बंद पाळून प्रशासनाला निवेदन.




तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- महाराष्ट्र फर्टीलायझर्स सिड्स डीलर्स असोसिएशन कडुन राज्यातील कृषी सेवा केंद्र चालकांच्या प्रलंबित मागण्याबाबत २७ एप्रिल पासून बेमुदत बंद आंदोलन केले जात असून पैठणला ही कृषी सेवा केंद्र चालकांनी आपापली आस्थापना बंद ठेवत प्रशासनाला मागण्यांचे निवेदन दिले.

पैठण तालुक्यातील व्यापाऱ्यांनी बेमुदत बंद बाबत पैठणचे तहसीलदार,तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती कृषी अधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी सुनील रावस मनोज पहाडे, जितेंद्र पांडे,नगरसेवक महेश मुंदडा व्यापारी संघाचे अध्यक्ष स्वदेश पांडे,व्यापारी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर उगले पाटील अशोक चितलांगी कृषी अध्यक्ष नामदेव शिरसाठ जाधव सुसे उमेश तट्टू सह मोठया प्रमाणात कृषी सेवा केंद्राचे संचालक उपस्थित होते. लिंकिंग बंद करणे, एच.टी.बी.टी. कापूस बियाणे बंद करणे, विक्रेते साक्षीदार मानावे, तपासणी अधिकाऱ्यांची संख्या वाढवावी, साथी पोर्टलची मर्यादा ठेवणे, रासायनिक खतांचा पुरवठा एफ.ओ.आर. प्रमाणे करणे, सॅम्पलची रक्कम देणे, युरिया डी.ए.पी. वितरण, मुदत बाह्य कीटक नाशके, हवामान बदल नुकसान भरपाई असे अनेक मुद्दे प्रशासनाला दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्ताने कॉस्मो फाऊंडेशनचा पुढाकार; महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये विविध उपक्रम




छत्रपती संभाजीनगर , २४ एप्रिल २०२६: जागतिक वसुंधरा दिनानिमित्ताने कॉस्मो फाऊंडेशनने विविध ठिकाणी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. फाऊंडेशन या उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाचे रक्षण तसेच सामाजिक बांधिलकीप्रती आपली वचनबद्धता दृढ करण्याकरिता प्रयत्नशील असल्याचे दर्शवते. यावर्षीच्या ‘नर्चर अर्थ’ या संकल्पनेअंतर्गत आयोजित या मोहिमेत कंपनीचे कर्मचारी, स्थानिक नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने सहभागी करुन घेण्यात आले होते. पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि त्याविषयीच्या वर्तणूकीत सकारात्मक बदल घडवून आणणे, हा या उपक्रमाच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. या अंतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून निसर्गाचे महत्त्व पटवून शाश्वत विकासासाठी जनजागृती करण्यात आली.

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ८३३/२०२५

अर्जदार :- १) एकनाथ गंगाधर प्रधान, बय. ५८ वर्षे, धंदा, शेती व खाजगी नौकरी, रा. अंबेलोहळ, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ह.मु. लोकमान्य चौक, बजाजनगर, वडगांव कोल्हाटी ता. जि. औरंगाबाद. २) खंडेराव गंगाधर प्रधान, वय. ६१ वर्षे, धंदा, शेती, रा. अंबेलोहळ, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : - निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत्त.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, गंगाधर यमाजी प्रधान है मौजे अंबेलोहळ ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ०९/०९/२००० रोजी मौजे अंबेलोहळ ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ व २ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे गंगाधर यमाजी प्रधान यांना अर्जदार क. १ व २ हे मुले आहे मयत गंगाधर यमाजी प्रधान यांची पत्नी व अर्जदार क. १ व २ यांची आई नामे चंद्रभागाबाई गंगाधर प्रधान ही यापुर्वीच मयत झालेली आहेत. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ व २ हेच एकमेव कायदेशीर बारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा, मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक २८/१२/२०२५

सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## अग्रलेख...

# बालेन शहांची तिरकी चाल

गेल्या दशकभरात भारताच्या शेजारी देशांमध्ये मोठ्या उलथापालथी सुरू आहेत. त्यातून भूतान वगळता एकही देश सुटलेला नाही. सुरुवात झाली ती पाकिस्तानपासून. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून पाकिस्तानात मोठी अस्वस्थता निर्माण झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढलेला, कट्टर देशभक्त हिंदू नेता आणि त्यांचा भारतीय जनता पक्ष पूर्ण बहुमताने भारताच्या केंद्रीय सत्तेत आला हे पाकिस्तानी लष्करशहा आणि राजकारण्यांच्या पचनी अद्याप पडले नाही. त्यावेळी नवाज शरीफ हे त्यामानाने थोडे मवाळ असलेले नेते पंतप्रधान होते. भारतासोबत कोणत्या पातळीवर संबंध ठेवायचे याची जाण आणि अनुभव त्यांच्या पाठीशी होता. पंतप्रधान झाल्यानंतर मोदी यांनीही संबंधात निदान कटुता वाढू नये म्हणून शपथविधीला शरीफ यांना आमंत्रित केले होते. एवढेच नव्हे तर काबूलच्या भेटीवर असताना शिष्टाचार सोडून मोदी हे शरीफ यांच्या निवासस्थानी गेले होते. दोन्ही देशांमधील तणाव कमी व्हावा, मैत्री निर्माण व्हावी, या उद्देशानेच मोदी यांनी हे पाऊल उचलले होते. पण, एका भ्रष्टाचार प्रकरणात न्यायालयाने अपात्र घोषित केल्याने शरीफ यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. काही काळ त्यांना देशही सोडावा लागला. २०१८ च्या निवडणुकीत 'प्ले बॉय' म्हणून परिचित असलेले माजी क्रिकेटपटू इम्रान खान यांचा 'पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ' हा पक्ष सत्तेवर आला आणि ते पंतप्रधान झाले. पण, पुढचे वर्ष त्यांच्यातील राजकीय गुण आणि नेतृत्वाचे कसोटी घेणारे ठरले. कारण, २०१९ मध्ये नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान झाले. ऑगस्ट महिना भारत आणि पाकिस्तानात मोठे वादळ घेऊन आला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३७० वे कलम हटविल्याची घोषणा केली. वास्तविक पाहता ३७० कलम हटविणे हा भारताचा अंतर्गत प्रश्न होता. इम्रान खान यांना मिरच्या झोंबण्याचे काहीच कारण नव्हते. पण, स्वतःला नायक म्हणून सिद्ध करण्याच्या नादात त्यांनी भारतासोबतचे संबंध तोडून टाकले. भारताच्या पंतप्रधानांबद्दल सातत्याने अपशब्दांचा वापर केला. अखेर एप्रिल २०२२ मध्ये या इम्रान खान नियाजींनाही भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली पंतप्रधानपदावरून हाकलण्यात आले. मार्च २०२३ मध्ये अटक केल्यापासून भारत आणि मोदींना शिव्यांची लाखोली वाहणारे इम्रान खान अजूनही तुरुंगात सडत आहेत.

हा केवळ पाकिस्तानचाच किस्सा होता असे नाही. केपी ओली पंतप्रधान असताना नेपाळनेही भारताशी खाजविण्याचा प्रयत्न केला. भारताच्या पायथ्याशी असलेल्या लंकेनेही चीनच्या बळावर दिल्लीशी पंगा घेतला. याचा परिणाम असा झाला की लंकेचे नागरिक भिकेला लागले. मोठे मन केलेल्या भारताने मदत केल्यानेच श्रीलंका आज तग धरून आहे. बांगलादेशची परिस्थिती काय झाली हे सांगायलाच नको. भारताशी व्यापार सुरू असताना ज्या बांगलादेशची अर्थव्यवस्था शिलकीत होती, ती रसातळाला गेली. कारण, काय तर मोहम्मद युनूस सरकारचा भारतद्वेष आणि हे युनूस म्हणे अर्थतज्ज्ञ...असो, वास्तवात नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तानसारख्या देशांना तर भारत काखेत घेऊन फिरू शकतो. भारताच्या शांततापूर्ण आणि संयमी धोरणाचा फटकाही अनेकदा बसला. त्याचे आर्थिक पातळीवर नुकसानही सहन करावे लागले. श्रीलंका आणि बांगलादेशातील घडामोडी ही ताजी उदाहरणे आहेत. नेपाळनेही भारताच्या उदार धोरणाचा गैरफायदा घेण्याचाच प्रयत्न केला. गणतंत्राच्या गोंडस नावाखाली चीनच्या मदतीने २००८ मध्ये जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमधील राजेशाही व्यवस्था संपविण्यात आली. नेपाळचे तत्कालीन राजे ज्ञानेंद्र यांना काठमांडूतील राजवाडा सोडण्यास भाग पाडले गेले आणि त्याचे संग्रहालयात रूपांतर करण्यात आले. त्यानंतर नेपाळमध्ये कम्युनिस्ट विचारांचा पगडा असलेली सरकारे सत्तेवर आली. अर्थात २००८ पासून जवळपास १८ वर्षांमध्ये १४ सरकारे आली अन् गेली. यापैकी पुष्पकमल दहल ऊर्फ प्रचंड आणि केपी शर्मा ओली यांनीच आलटून-पालटून सत्ता भोगली. विशेष म्हणजे हे दोघेही कट्टर भारतविरोधी आणि चीनचे समर्थक. गेल्या १८ वर्षांत नेपाळमध्ये कधीही राजकीय अथवा आर्थिक स्थिरता आली नाही. भ्रष्टाचारामुळे देश पोखरून निघाला. प्रचंड गरिबी आणि बेकारीमुळे जनता दारिद्र्याच्या खाईत लोटली गेली. पोट भरण्यासाठी नागरिकांना परदेशी पलायन करण्यावाचून दुसरा पर्यायच उरला नाही. गरीब नेपाळी नागरिकांचा एकमेव आधार म्हणजे भारत. आज भारतातील प्रत्येक लहान-मोठ्या शहरांमध्ये नेपाळी नागरिक सुरक्षा रक्षकाचे वा अन्य किडूकमिडूक काम करून पोट भरताना आढळतात. प्रचंड आणि ओली यांनी सातत्याने भारतविरुद्ध भूमिका घेऊनही दिल्लीने कधीही प्रत्युत्तर दिले नाही. भारताचा हा मोठपणाच होय. सुदैव असे की बहुतांश नेपाळी जनता भारताच्या बाजूने आहे. काठमांडूत काहीही घडामोडी सुरू असल्या तरी सीमावर्ती भागांत मात्र, दोन्ही देशांमध्ये व्यापाराबरोबच रोटी-बेटी व्यवहार देखील सुरू असतात. राजकारणी आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट काराभाराला नेपाळी जनता प्रचंड कंटाळली. सरकारी निधीचा दुरुपयोग होत असल्याने विकासकामे ठप्प पडली होती. त्यातच पंतप्रधान ओली यांनी ४ सप्टेंबर २०२५ रोजी सोशल मीडियावर बंधने घातल्याने जनरेशन-झेडच्या (जेन-झी) संतापाचा उद्रेक झाला. महसूल वाढीसाठी सोशल मीडियावर बंधने घातल्याचा दावा सरकारने केला असला तरी त्यामागील खरे कारण म्हणजे युवावर्गाचा राजेशाही व्यवस्थेकडे वाढत असलेला ओढा हे होते. या निर्णयानंतर जनता रस्त्यावर उतरली आणि भ्रष्ट नेत्यांचे इमले जाळत त्यांना रस्त्यावर आणत प्रसाद दिला. केपी शर्मा ओली सरकारला राजीनामा द्यावा लागला. काही काळ हंगामी सरकारच्या हातात सत्ता राहिल्यानंतर मार्च २०२६ मध्ये झालेल्या निवडणुकीत जेन-झी चे नेते बालेन शहा यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचा प्रचंड विजय झाला. विशेष म्हणजे ३५ वर्षीय बालेन शहा यांनी माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनाच शिंगावर घेत त्यांचा दणदणीत पराभव केला. रॅपर असलेले बालेन मुळातच बंडखोर स्वभावाचे. गाण्यांमधून ते भ्रष्टाचारावर प्रहार करायचे. त्यामुळेच युवकांमध्ये ते प्रचंड लोकप्रिय. मात्र, बालेन शहा यांचा पवित्रा भारतविरोधी राहिला आहे. काठमांडूचे महापौर असताना त्यांनी 'ग्रेटर नेपाळ'चा मुद्दा उचलून धरत भारताचा बिहार आणि उत्तराखंडमधील काही भाग नेपाळच्या नकाशात दाखविला होता. तसेच भारताच्या चित्रपटांवर बंदीही घातली होती. त्यांचे शिक्षण कर्नाटकातील एका शिक्षण संस्थेत झाले आहे. पंतप्रधान म्हणून त्यांचा पहिला भारत दौरा होणार आहे. दौऱ्याची तारीख निश्चित झाली नाही. मात्र, दौऱ्यावर येण्यापूर्वीच त्यांच्याविरुद्ध सीमावर्ती भागातील नागरिक आणि युवकांनी आंदोलन सुरू केले आहे. विद्यार्थी संघटनांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्याने काठमांडूत जेन-झी तरुण पुन्हा रस्त्यावर उतरले आहेत, तर राजस्व वाढविण्याच्या उद्देशाने भारतातून शंभर रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर सीमाशुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्याने गरीब नेपाळी नागरिक संतप्त झाले आहेत. कारण, खाद्यवस्तू आणि अन्य जीवनपयोगी सामान स्वस्त मिळत असल्याने नेपाळी नागरिक भारतात येऊन सामानाची खरेदी करतात. याशिवाय, नेपाळमध्ये जाणाऱ्या भारतीय वाहनांना नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. पंतप्रधान झाल्यापासून महिनाभरातच त्यांच्या कारभारावर टीका होऊ लागली. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून बालेन मंत्रिमंडळातील गृहमंत्री सुदन गुरूंग यांना राजीनामा द्यावा लागला. अनौपचारिक व्यापाराला आळा घालण्यासाठी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी सीमाशुल्क आकारत असल्याचा दावा केला जात असला तरी सीमेवरील देवाणघेवाणीचा संबंध गरीब जनतेच्या रोजच्या जीवनाशी आहे. दिवसभर काम केल्यानंतर नेपाळी नागरिक सायंकाळी खाण्यापिण्याच्या वस्तू खरेदीसाठी भारतात येतात. भारतात येणे ही काही चंगळ नव्हे तर त्यांची गरज आहे. जनतेच्या जगण्याच्या मुद्यांमध्ये अनावश्यक लुडबूड करण्याचे कारण नाही. तरीही बालेन शहा तिरकी चाल चालत आहेत. मात्र, ज्या जनतेने सत्ता बहाल केली, ती काढून घेण्याची शक्तीही जनतेत आहे, हे त्यांनी ध्यानात ठेवावे. त्यातच नेपाळचे आणि त्यांचेही भले आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# युद्धबंदी आणि नाकेबंदी!

'जनरल समर'ने इराण युद्धात राष्ट्रपती ट्रम्प यांचे हात बांधले आहेत काय? दुसऱ्या महायुद्धात जनरल डिसेंबरने बलाढ्य जर्मनीला पराभूत केले असे मानले जात होते. जनरल डिसेंबर म्हणजे रशियातील डिसेंबर महिन्यातील कडक हिवाळा. जर्मन सैन्य तो हिवाळा सहन करू शकले नाही आणि याची परिणती जर्मनीच्या पराभवात झाली असे नंतर सांगितले गेले आणि त्यात तथ्यही होते.

आता 'जनरल समर' म्हणजे आखाती देशांमधील उन्हाळ्यामुळे राष्ट्रपती ट्रम्प यांचे हात बांधले गेले असल्याचे मानले जाते. इराणमध्ये फौजा घुसविण्याची त्यांनी योजना होती. यासाठी त्यांनी २५०० सैनिक असलेल्या 'यूएसएस ट्रिपोली' या आपल्या युद्धनौकेला जपानहून आखाती देशात आणले होते. पण, अमेरिकन सैन्य इराणचा उन्हाळा सहन करू शकणार नाहीत. अनेक सैनिक या उन्हानेच मरण पावतील असे ट्रम्प यांना सांगण्यात आले. मग, त्यांनी इराणमध्ये फौजा घुसविण्याचा विचार सोडून दिला व हवाई हल्ले करण्याची योजना आखली. आता ती योजनाही थंड्या बस्त्यात ठेवण्यात आली असल्यासारखे दिसते.

एकदा थांबलेले युद्ध पुन्हा सुरू करणे किती अवघड आहे याचा प्रत्यय राष्ट्रपती ट्रम्प यांना येत असावा. आमची नवी शस्त्रास्त्रे तयार आहेत, आजवर इराणने न पाहिलेली, न अनुभवलेली शस्त्रास्त्रे आता मी वापरणार आहे, आमचे बॉम्ब जहाजावर चढविले जात आहेत- अशा आणि आणखी काही वल्गना करणाऱ्या राष्ट्रपती ट्रम्प यांना पाकिस्तानची मध्यस्थी पुन्हा एकदा मान्य करावी लागली. कारण, ट्रम्प यांच्यासमोर दुसरा पर्याय नव्हता. पाकिस्तानचे पंतप्रधान व फिल्ड मार्शल यांनी मला युद्धबंदी वाढविण्याची विनंती केली आणि मी ती विनंती मान्य केली. मात्र होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी कायम राहील असे ट्रम्प यांनी घोषित केले. म्हणजे युद्धबंदी आणि नाकेबंदी या दोन परस्परविरोधी बाबी आता समोर आल्या आहेत. यासाठी दोन्ही देशांनी परस्परांवर अटी लादल्या आहेत. इराण चर्चेला राजी झाल्याशिवाय होर्मुझची नाकेबंदी उठणार नाही असे अमेरिकेने म्हटले आहे तर अमेरिकेने ही नाकेबंदी उठविल्याशिवाय इराण युद्धबंदीवर चर्चा करणार नाही असे या देशाने म्हटले आहे. आणि यात अडकला आहे पाकिस्तान.

**इराण सज्ज :** दुसरीकडे इराण युद्धाच्या दुसऱ्या भागासाठी सज्ज होत आहे. एकीकडे युद्धविरामची चर्चा तर दुसरीकडे युद्धाची तयारी अशी इराणची भूमिका दिसते. अमेरिका व इराण यांच्यातील अविश्वासाची दरी एवढी खोल आहे की इराण अमेरिकेच्या कोणत्याही आश्वासनावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. त्यामुळे इराण जराही गाफील नाही.

**नवे खेळाडू :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या या युद्धात चीन व रशिया यांचा अधिकृतपणे प्रवेश होण्याचा संकेत आहे. चीन व रशिया यांच्या भूमिका लक्षात घेत ट्रम्प यांनी युद्धविराम वाढविण्याची घोषणा केली असे मानले जाते. युद्धाच्या पहिल्या भागात ट्रम्प यांना चीन व रशियाच्या अप्रत्यक्ष सहभागाची फार कल्पना आली नसावी, आता ती आली आहे असे दिसते. युद्धाच्या पहिल्या भागात चीन व रशिया यांनी इराणला तांत्रिक लष्करी साहाय्य पुरविले होते. मात्र त्यांनी स्वत:ला अलिप्त ठेवले होते. आता या दोन्ही देशांनी सरळसरळ इराणला पाठिंबा देत अमेरिकेचा विरोध केला आहे. यातही चीनच्या राष्ट्रपतींनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन व्हावे असे म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार करता होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणचा अधिकार स्थापित होतो. चीनने हीच भूमिका वेगळ्या प्रकारे मांडली आहे. इराणच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी चीन कटिबद्ध आहे असे या देशाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. या साऱ्याचा विचार अमेरिकेला करावा लागत आहे.

**अरब देश विरोधात :** इराणच्या वीजकेंद्रांवर अमेरिकेने हल्ला केल्यास, बहरिन, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कुवैत व कतार या पाच देशांवर इराण हल्ला चढविणार याची कल्पना ट्रम्प यांना आली आहे. या देशांना आता युद्ध नको आहे. युद्धाच्या पहिल्या भागात या देशांना फार मोठी किंमत मोजावी लागली आहे. युद्ध पुन्हा सुरू झाल्यास ते अधिक भयावह असेल व त्यात आपली तेल शुद्धीकरण यंत्रणा बेचिराख होऊ शकते याची कल्पना आल्याने या देशांनी ट्रम्प यांच्यावर युद्ध न करण्याचा दबाव वाढविला आहे.

**फक्त इराण तयार :** अमेरिका युद्धासाठी तयार नाही, अरब देश युद्धासाठी तयार नाहीत. पण, इराण मात्र युद्धासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे मानले जाते. अमेरिका इराणचे लष्करी सामर्थ्य उद्ध्वस्त झाले असल्याचा दावा करीत असला तरी ते शाबूत असल्याचे मानले जाते. इराणने आपली सारी लष्करी यंत्रणा भूमिगत उभारली आहे. आपल्या भात्यातही नवनवी शस्त्रास्त्रे आहेत आणि त्याची चुणूक अमेरिकेला दिसेल असे इराणने म्हटले आहे.

**आण्विक संयंत्रही शाबूत? :** इराणचे आण्विक संयंत्र अमेरिकेने पूर्णपणे उद्ध्वस्त केल्याचा दावा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केला असला तरी इराणचे आण्विक संयंत्र भूमिगत असून ते पूर्णपणे सुरक्षित असल्याचे निष्कर्ष काही आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी काढले आहेत. इराणच्या आण्विक कार्यक्रमाला पायबंद घालणे हे आमचे आता एकमेव उद्दिष्ट असल्याचे ट्रम्प म्हणत आहेत आणि २०१५ मध्ये अमेरिका-इराण यांच्यात झालेल्या करारापेक्षाही चांगला करार दोन्ही देशात होत असल्याचा दावा ट्रम्प करीत आहेत. त्यांचा हा दावा पोकळ असल्याचे मानले जाते.

**ओबामा करार :** बराक ओबामा राष्ट्रपती असताना त्यांनी इराणच्या आण्विक कार्यक्रमाला लगाम घालणारा सर्वांत चांगला करार घडवून आणला होता. दोन वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हा करार करण्यात आला होता. त्यात इराणवर ३.७ टक्के युरेनियम शुद्धतेची मर्यादा घालण्यात आली होती. म्हणजे इराणला युरेनियम युद्धतेचा आपला कार्यक्रम तर सुरू ठेवता येईल मात्र युरेनियमची शुद्धता ३.७ टक्क्यांपेक्षा अधिक वाढविता येणार नाही हे साध्य करण्यात आले होते. आण्विक ऊर्जा तयार करण्यासाठी युरेनियमची शुद्धता ३ ते ५ टक्के असावी लागते. तेवढीच सूट इराणला देण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांकडून इराणच्या आण्विक प्रकल्पांची नियमित तपासणी केली जात होती आणि इराण ३.७ टक्क्यांपेक्षा अधिक युरेनियम शुद्ध करू शकणार नाही याची काळजी घेण्यात येत होती. एकप्रकारे इराणचा आण्विक कार्यक्रम गोठविण्यात अमेरिकेला यश आले होते.

**ट्रम्प यांचा आत्मघात :** बराक ओबामा यांच्यानंतर ट्रम्प राष्ट्रपती झाले आणि त्यांनी हा करार मोडीत काढला आणि याचा फायदा उठवीत इराणने आपली युरेनियम शुद्ध करण्याची क्षमता ६० टक्क्यांवर केली. कारण अण्वस्त्र तयार करण्यासाठी युरेनियमची शुद्धता ९० टक्के असावी लागते. ज्या गतीने इराणची वाटचाल सुरू होती, ती पाहता दोन वर्षांत इराण अण्वस्त्र तयार करील आणि नंतर आपल्याला काहीच करता येणार नाही याची कल्पना आल्याने ट्रम्प बिथरले. त्यात इस्रायलने त्यांना साथ दिली आणि दोघांनी युद्धाचा निर्णय घेतला.

**बेपत्ता युरेनियम :** इराणजवळ ६० टक्के शुद्धतेचे ४४० किलो युरेनियम असल्याचे मानले जाते. इराणने हे युरेनियम चीनमध्ये लपविले आहे की रशियात याची चिंता ट्रम्प यांना भेडसावीत आहे. कारण या युरेनियमचा ठावठिकाणा अद्याप अमेरिकेला लावता आलेला नाही. इराणने अति सुरक्षित जागी ते ठेवले असल्याचे मानले जाते. आणि हे युरेनियम कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेच्या स्वाधीन न करण्याची भूमिका इराणने घेतली आहे. सध्या सारे जग युद्ध आणि युद्धविराम यांच्यातील सूक्ष्म सीमारेषेवर श्वास रोखून थांबले आहे. आणि ही सीमारेषा ओलांडण्याचा निर्णय फक्त एक व्यक्ती करणार आहे, राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# विवाहासाठी पालकांची संमती अनिवार्य करा!

लग्न म्हणजे केवळ अडीच अक्षरे नव्हेत. सात पावलांनी जोडले जाणारे जन्मभराचे ऋणानुबंध, आयुष्यातील एक अनोखा मनस्वी प्रसंग व आयुष्यभर जतन करण्यासाठीचा आनंदी सोहळा आहे. मात्र कटकारस्थानी लोकांमुळे हा आनंदमय सोहळा दुःखात परिवर्तित होत आहे. हेच दुःख दूर करायचे झाल्यास कायद्यानुसार आता विवाहासाठी पालकांची संमती अनिवार्य करायलाच हवी. ही आता काळाची गरज बनली आहे. तसे पाहता हिंदू विवाह कायदा १९५५ अंतर्गत सज्ञान व्यक्तींना लग्नासाठी आई-वडिलांची परवानगी बंधनकारक नाही. जर वधूचे वय १८ आणि वराचे वय २१ वर्षे पूर्ण असेल तर ते स्वतःच्या मर्जीने लग्न करू शकतात. कायद्यानुसार प्रेमविवाह किंवा कोर्ट मॅरेजसाठी पालकांची परवानगी आवश्यक नसते. याच कायद्याच्या आड आज आपल्या भारतात 'लव्ह जिहाद' आणि फसवणुकीच्या घटना वाढल्या आहेत. यावर आळा घालणे काळाची गरज असल्याने कायद्यात त्यानुसार बदल अनिवार्य आहे. आई-वडील मुलांना जन्माला घालतात. त्यांना चांगले संस्कार देत मोठे करतात. त्यांच्या शिक्षणासह सर्व गरजांची पूर्तता व्हावी म्हणून रात्रीचा दिवस करतात. त्यांना सक्षम नागरिक बनविण्यासाठी आपल्या गरजा कमी करतात. मात्र मुलगा असो किंवा मुलगी वयात आले की, पळून जाऊन लग्न करतात. आम्ही सज्ञान झालो, आता आम्हाला तुमच्या परवानगीची गरज नाही असेही मुले, मुली ठासून सांगतात. अशावेळी त्या पालकांसमोर रडण्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो. याचा अर्थ भावनेच्या विश्वात आंधळे झालेली मुले-मुली आपल्या आई-वडिलांच्या घराला धर्मशाळा समजतात की काय, असाही प्रश्न आता उपस्थित झाला आहे.



नागपुरातील प्रख्यात विधिज्ञ ॲड. श्याम आंभोरे यांनी तर चुकीच्या गोष्टी घडू नयेत, म्हणून पालकांचा वचक मुलांवर असावाच यावर भर दिला आहे. हा वचक कायद्याने संमतीच्या रूपात केला तर नक्कीच चुकीच्या घटना टळतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. ज्या काळात हिंदू विवाह कायदा पारित झाला, तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. आज परिस्थिती पूर्णतः बदलली आहे. शाळा लघुकोन, काटकोन, चौकोनसह सर्व काही शिकवते. पण आपले कोण हे मात्र परिस्थिती शिकवते. याच परिस्थितीची जाणीव नसल्याने सज्ञान असूनही मुला-मुलींचा निर्णय चुकतो. ते भावनेच्या भरात निर्णय घेतात आणि नंतर आयुष्यभर पश्चात्तापाच्या आगीत जळतात, म्हणूनच कौटुंबिक न्यायालयातील निवृत्त प्रमुख विवाह समुपदेशक डॉ. शेखर पांडे यांनी लग्नासाठी पालकांची संमती अनिवार्य करा, यावर शिक्कामोर्तब केले आहे. सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर मेंघर आणि मुकेश अग्रवाल यांनीही लग्नासाठी आई-वडिलांची संमती कायद्याने अनिवार्य करण्यावर भर दिला आहे. वर्तमानात प्रेमविवाहाचे फॅड वाढले आहे. जे भावनेच्या भरात निर्णय घेतात ते पुढे एका वर्षात घटस्फोट घेऊन मोकळे होतात. यात मुलींच्या आयुष्याचे वाटोळे होते. मुलेही सामाजिक आगीत होरपळले जातात. प्रेमविवाह करणे वाईट नाही. पण याकरिता मुला-मुलींनी आपल्या आई-वडिलांना विश्वासात घ्यावे. कायद्याचा कीस पाडून अनेकांनी जो काही पोरखेळ सुरू केला, तो शेकडो लोकांसाठी कर्दनकाळ ठरला आहे. समाजात आणि चित्रपटांच्या माध्यमातून कर्तव्यकठोर पालकांना बदनाम केले जात आहे. जाणीवपूर्वक अशाच गोष्टी चित्रपटातून दाखविल्या जातात. उदाहरण द्यायचे झाल्यास 'कयामत से कयामत तक,' 'एक दुजे के लिए' या चित्रपटांतून आई-वडिलांनाच बदनाम केले गेले. पण 'मैंने प्यार किया' या चित्रपटाने पालकांची संमती कशी लाभदायक ठरते हे दाखविले आहे. आपल्याही जीवनाचा शेवट हा सुखद आणि गोड व्हायला हवा. हीच मनोकामना ठेवत लग्नाचा निर्णय घेताना पालकांची संमती अनिवार्य करायला हवी. प्रत्येक प्रकरणात आई-वडील खलनायक कसे राहतील, याचाही विचार व्हायला हवा. शिक्षण, पालनपोषण आणि वैद्यकीय खर्च, सामाजिक संरक्षण देताना पालक योग्य होते. पण लग्नाची वेळ येताच ते मुला- मुलींसाठी खलनायक कसे यावरही मंथन व्हायलाच हवे. मुला-मुलींचे जसे अधिकार असतात, तशीच काही कर्तव्येदेखील आहेत ना? मग केवळ अधिकार सांगायचे आणि कर्तव्य विसरायचे का? आई-वडिलांना दुःख देऊन कुठला मुलगा किंवा मुलगी सुखी झाला यासंदर्भातील उदाहरण शोधूनही सापडणार नाही. मग आपण त्यांनाच बदनाम का करतो? लग्न करण्यापूर्वी त्यांची संमती का घेत नाही. कायद्यानुसार जे काही बदल घडायचे ते भविष्यात होतील. पण तत्पूर्वी समाजानेच लग्नासाठी पालकांची संमती असेल तरच त्यांना मान्यता द्यावी.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# बेपत्ता महिलांचे भयावह वास्तव

यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील ३४ मुली काही महिन्यांपासून बेपत्ता असल्याची बातमी काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रात झळकली आणि संपूर्ण समाजाला अस्वस्थ करून गेली. राज्य शासनाने या गोष्टीची गंभीर दखल घेत पोलिस प्रशासनाला तत्काळ कठोर कारवाईचे आदेश दिले ही गोष्ट संतोषजनक असली तरीही ही घटना केवळ एका तालुक्यापुरती मर्यादित नाही, तर देशभर पसरलेल्या एका गंभीर वास्तवाची ती जाणीव करून देते. भारताच्या विविध राज्यांमध्ये महिलांच्या बेपत्ता होण्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत आणि अनेक प्रकरणांमध्ये त्यांचा शोध लागत नाही. शोध जेव्हा शोध लागतो तेव्हा त्या स्वतःचे अस्तित्व हरवून बसलेल्या असतात. या पृष्ठभूमीवर हा विषय केवळ बातमीपुरता न राहता समाजाच्या चिंतनाचा आणि कृतीचा विषय बनणे आवश्यक आहे.

भारतामध्ये महिलांच्या बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदवही (एनसीआरबी) च्या अहवालांनुसार दरवर्षी लाखो महिला आणि मुली बेपत्ता होतात. काही वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकली, तर परिस्थिती किती गंभीर आहे हे लक्षात येते. एका अहवालानुसार २०२१ साली सुमारे साडेतीन लाखांहून अधिक महिला बेपत्ता झाल्या होत्या. यामध्ये मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. यातील अनेक प्रकरणे नंतर शोधली जात असली, तरी हजारो महिलांचा मागमूसही लागत नाही. ही बाब केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून प्रत्येक आकड्यामागे एक कुटुंब, एक आयुष्य आणि असंख्य स्वप्ने उद्ध्वस्त झालेली असतात.

महिलांच्या बेपत्ता होण्यामागील कारणे विविध प्रकारची आहेत. काही प्रकरणांमध्ये मुली प्रेमसंबंधामुळे किंवा कौटुंबिक तणावामुळे, घरगुती भांडणांमुळे, सावत्र आई किंवा वडील यांच्या त्रासामुळे किंवा मनोरुग्ण असल्यामुळे घर सोडून जातात. काही वेळा नोकरीच्या आमिषाने किंवा चांगल्या आयुष्याच्या स्वप्नांनी त्यांना शहरांकडे खेचले जाते. मात्र, या सर्व कारणांपलीकडे एक भयावह वास्तव म्हणजे मानव तस्करीचे जाळे आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील गरीब, अशिक्षित आणि असुरक्षित मुली या टोळ्यांच्या निशाण्यावर असतात. त्यांना चांगल्या नोकरीचे, लग्नाचे किंवा शहरात स्थायिक होण्याचे आमिष दाखवून पळवून नेले जाते आणि नंतर त्यांचा विविध प्रकारे गैरवापर केला जातो. मानव तस्करी ही या समस्येची सर्वांत भीषण बाजू आहे. बेपत्ता झालेल्या अनेक महिलांना जबरदस्तीने वेश्याव्यवसायात ढकलले जाते. काहींना घरगुती नोकर म्हणून विकले जाते, तर काही महिलांना जबरदस्तीने लग्नासाठी विकले जाते. विशेषतः अशा राज्यांमध्ये जिथे स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. या सर्व प्रक्रियेत महिलांची ओळख, स्वातंत्र्य आणि मानवी हक्क पूर्णपणे हिरावून घेतले जातात. अनेक वेळा त्यांचे धर्मांतरण केले जाते. एका विशिष्ट धर्माची संख्या वाढवून घेण्यासाठी या महिलांचा उपयोग केला जातो. याशिवाय, बेपत्ता झालेल्या महिलांवर शोषण आणि हिंसेचे संकट मोठ्या प्रमाणात कोसळते. त्यांच्यावर अत्याचार, मारहाण, मानसिक छळ यासारखे आघात होतात. अनेक वेळा या महिलांना अशा परिस्थितीत ठेवले जाते की त्यांना बाहेरच्या जगाशी संपर्क साधता येत नाही. त्यांची ओळख लपवली जाते, त्यांना वेगळ्या ठिकाणी हलवले जाते आणि त्यांना सतत भीतीच्या छायेत जगावे लागते. या सगळ्या प्रक्रियेत त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य गंभीरपणे बिघडते. काही प्रकरणांमध्ये महिलांचा वापर गुन्हेगारी कृत्यांसाठीही केला जातो. भीक मागणाऱ्या टोळ्या, ड्रग्ज तस्करी, लहानसहान गुन्हेगारी नेटवर्कमध्ये त्यांना जबरदस्तीने सामील केले जाते. काही वेळा त्यांना अशा परिस्थितीत ढकलले जाते की त्यांना गुन्हेगारी जीवन स्वीकारण्याशिवाय पर्याय उरत नाही. ही परिस्थिती केवळ त्या महिलांसाठीच नव्हे, तर समाजासाठीही धोकादायक आहे.

या समस्येमागे सामाजिक, आर्थिक आणि प्रशासनिक कारणांची साखळी आहे. गरिबी, बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव, कुटुंबातील हिंसा, सुखवस्तू जीवनाची स्वप्न, समाज माध्यमे ही या समस्येची मूळ कारणे आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये शिक्षण आणि रोजगाराच्या संधींचा अभाव असल्यामुळे मुली प्रलोभनाने सहजपणे फसवल्या जातात. सोशल मीडियाचा वाढता वापरही या समस्येला खतपाणी घालत आहे. अनोळखी व्यक्तींशी संपर्क, खोटी ओळख आणि फसवणूक यामुळे अनेक मुली जाळ्यात अडकतात.

प्रशासनाच्या पातळीवरही काही मर्यादा दिसून येतात. अनेक वेळा लोक आपली बदनामी होईल किंवा पोलिसांची झंझट नको म्हणून तक्रार करायला समोर जात नाही. अनेक वेळा बेपत्ता प्रकरणांची नोंद उशिरा होते किंवा त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. पोलिस यंत्रणेवर मोठा ताण असल्यामुळे प्रत्येक प्रकरणावर सखोल तपास होणे कठीण जाते. काही वेळा राज्यांमधील समन्वयाचा अभावही तपासात अडथळा ठरतो. त्यामुळे अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. या पृष्ठभूमीवर समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. कुटुंबांनी आपल्या मुलींशी संवाद वाढवणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मुलींमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. आधुनिक शिक्षणासोबतच त्यांना धर्म आणि जीवन मूल्यांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. नोकरी, शिक्षण किंवा इतर कारणांसाठी बाहेर पडताना योग्य पडताळणी करणे, अनोळखी लोकांवर सहज विश्वास न ठेवणे यासारख्या गोष्टींची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

प्रशासनानेही या समस्येकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. बेपत्ता प्रकरणांची तत्काळ नोंद, तांत्रिक साधनांचा वापर, राज्यांमधील समन्वय यावर भर दिला पाहिजे. तसेच, वाचवलेल्या महिलांचे पुनर्वसन आणि त्यांना पुन्हा समाजात सन्मानाने उभे करण्यासाठी ठोस धोरणे राबवणे गरजेचे आहे. लहानपणी हरवलेली 'उमा' मोठेपणी 'उमराव जान' झाल्यावर सापडली तरीही तिला स्वधर्मात आणण्याची आणि तिचे पुनर्वसन करण्याची हिंमत आणि क्षमता समाजाची हवी अन्यथा शोधमोहीम राबविण्याचा काही अर्थ उरणार नाही.

माध्यमांची भूमिका देखील येथे महत्त्वाची आहे. अशा घटना केवळ एकदाच बातमी म्हणून न मांडता त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. कारण माध्यमांमुळेच अनेक वेळा अशा घटनांकडे समाजाचे लक्ष वेधले जाते. राळेगावमधील ३४ मुली बेपत्ता होण्याची घटना ही एक इशारा आहे. ती आपल्याला सांगते की ही समस्या आपल्या आजूबाजूलाच आहे आणि आपण तिच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. या घटनेने दिलेला हा इशारा आपण वेळेत ओळखला पाहिजे. मुलींच्या शाळा, महाविद्यालये व कार्यालयांमध्ये सुद्धा महिलांसमोर या विषयाची गंभीरता मांडली गेली पाहिजे तरच भविष्यात अशा घटनांना आळा घालता येईल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### ध्येयवेड्या कलावंतांची संघ-गंगा : शंभर प्रयोगांचा मैलाचा दगड!

''साधनेविण जे साध्य होते, त्यासी चमत्कार म्हणती...'' पण जेव्हा ही साधना राष्ट्रभक्तीने रसरसलेली असते आणि ध्येयवादाने भारलेली असते, तेव्हा इतिहास घडतो. 'संघ गंगा के तीन भगीरथ' या नाटकाचा प्रवास अथांग प्रखर राष्ट्रभक्तीच्या अनुभूतीचा प्रवाह आहे. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या आणि राष्ट्रवादाचे बीजारोपण करणाऱ्या महापुरुषांची गाथा आज शंभर प्रयोगांच्या सुवर्णशिखरावर पोहोचली आहे.

प्रसिद्ध वक्ते आणि लेखक श्रीधरराव गाडगे यांच्या सिद्धहस्त लेखणीतून संघ-गंगा प्रवाहित झाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रथम तीन सरसंघचालकांचे जीवनचरित्र या नाटकाच्या रूपाने साक्षात रंगमंचावर जिवंत होते, तेव्हा प्रेक्षक केवळ प्रेक्षक राहत नाहीत, तर त्या महान परंपरेचे साक्षीदार बनतात. या ऐतिहासिक नाट्यप्रवासाचा श्रीगणेशा ३० एप्रिल २०२५ रोजी नागपूरच्या वनामती सभागृहात झाला. रा. स्व. संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शक प्रा. रवींद्र भुसारी, निखिल मुंडले यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रयोगाला वैचारिक उंची प्राप्त झाली. पहिल्या प्रयोगाच्या अभूतपूर्व यशानंतर निर्मात्या सारिका पेंडसे आणि दिग्दर्शक संजय पेंडसे यांनी एका वर्षात १०० प्रयोगांचा अद्भुत संकल्प सोडला. निष्ठेच्या बळावर अशक्यही शक्य झाले. या नाट्यप्रवासाला गती दिली ती रामटेकच्या प्रयोगाने. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी केवळ सामाजिक उत्तरदायित्व म्हणून पाच प्रयोगांच्या प्रायोजकत्वाची जबाबदारी पेलली. तिथून निघालेली ही नाट्यदिंडी महाराष्ट्र ओलांडून गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तरांचल आणि कोकणच्या डोंगरदऱ्यांत पोहोचली. सर्वश्री मंगल प्रभात लोढा, अरुण लखानी, देवेश पेंढरकर, अजय संचेती, प्रसाद पुल्लीवार यांच्यासारख्या दानशूर व्यक्तिमत्त्वांच्या पाठबळामुळे या नाटकाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. नाटकाचा २५ वा प्रयोग नागपूरच्या सुरेश भट सभागृहात झाला. या प्रयोगाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, कृष्ण गोपालजी आणि डॉ. मनमोहन वैद्य यांच्या उपस्थितीने कलाकारांचे चैतन्य द्विगुणित झाले. मुंबईचे रवींद्र नाट्यमंदिर या सुवर्णमयी ५० व्या प्रयोगाचे



साक्षीदार ठरले. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. गुजरात दौऱ्यात सलग ३८ तास बसचा प्रवास करून, थकवा बाजूला सारून ४० व्या तासाला जुनागडच्या १,००० प्रेक्षकांसमोर झालेला प्रयोग या चमूच्या समर्पणाची साक्ष देणारा ठरला.

अहेरीच्या दुर्गम भागात ६०० ग्रामस्थांनी स्वतःची वाहने करून नाटकाला लावलेली हजेरी ही या कलेला मिळालेली सर्वांत मोठी पावती आहे. ९० प्रयोगांचा टप्पा पार करून ही गंगा आता राजधानी दिल्लीत पोहोचली आहे. दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा यांच्या सहकार्याने ९१ ते १०० या प्रयोगांचे आयोजन करण्यात आले आहे. शंभरावा प्रयोग दिल्लीतील केशव कुंज (झंडेवाला) येथे पार पडणार आहे. यावेळी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि विजया रहाटकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या नाटकाचे सर्वांत विलोभनीय वैशिष्ट्य म्हणजे त्यात एकही व्यावसायिक कलाकार नाही. संसार, नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून केवळ राष्ट्रभक्तीच्या ओढीने ही सामान्य माणसे रंगमंचावर असामान्य कामगिरी करत आहेत. दिग्दर्शक संजय पेंडसे याचे संपूर्ण श्रेय आपल्या टीमवर्कला आणि पडद्यामागील कलाकारांच्या अहोरात्र परिश्रमाला देतात.

संघ गंगा के तीन भगीरथ हा राष्ट्रभक्तीच्या जीवनरसांनी भरलेला एक आविष्कार आहे. भारतीय रंगभूमीच्या इतिहासात हा प्रयोग एका देदीप्यमान सुवर्ण अक्षरांनी कोरला जाईल यात शंका नाही.

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

### युद्धखोर राष्ट्राध्यक्ष

तरुण भारतच्या २५ एप्रिलच्या 'नतद्रष्ट, नाठाळ आणि निर्ढावलेला...' ही उचित विशेषणं अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना लावणारं संपादकीय परखड आहे. खोटं बोल पण रेटून बोल यावर ट्रम्प यांचा विश्वास आहे ही यातील महत्त्वाची टिप्पणी. महासत्ता म्हणवून घेण्याची या डॉलरदेशाची खुमखुमी तहहयात मक्तेदारी असल्यासारखाच ट्रम्प यांचा निर्णय घेण्याचा व फिरवण्याचा खाक्या दिसतो. आत्ताही राजकीय मताधिक्यासाठी इस्रायली ज्यू लोकांची अमेरिकास्थित लॉबी सांभाळून ठेवण्यासाठी इराण विरुद्ध युद्ध उकरून काढून सर्व जगाला वेठीला धरून ठेवण्याची शेखचिल्ली चाल अमेरिकेच्या आर्थिक स्थैर्यालाही बाधा आणणारी असू शकते हा विचार का केला जात नाही? भारत कधी कधी अमेरिकेचा मित्रही असतो असा आव आणणाऱ्या ट्रम्प यांना संयुक्त राष्ट्रसंघानं सदस्य देशांच्या दबावानं युद्धखोर इस्रायल व अमेरिका या तथाकथित परस्पर मित्रराष्ट्रांना युद्ध वल्गना आणि प्रत्यक्ष युद्ध बंद करायला भाग पाडलं पाहिजे.

**श्रीपाद कुलकर्णी**/९४२२५१५६४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## बीड जिल्ह्याचे दबंग खासदार मा. बजरंग बप्पा सोनवणे यांचा सत्कार



बीड जिल्ह्याचे दबंग खासदार मा. बजरंग बप्पा सोनवणे यांनी तालुक्यातील नामांकित श्री संस्कार इंग्लिश स्कूल चिंचोली माळी येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी, येथील जेष्ठ कार्यकर्ते गौतम बापु गलांडे, श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे, पांडुरंग नखाते, रा.कॉ. युवक आघाडीचे रामराजे गलांडे, संस्थेचे सदस्य अमोल गलांडे, श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन चे समन्वयक अदित्य गलांडे, शुभम नखाते, ज्ञानेश्वर पोपळघट, संस्कार गलांडे यांच्या सह गावातील नागरिक उपस्थित होते. (छाया :- अनिल गलांडे )

# बीडमध्ये मैत्रीचा रक्तरंजित शेवट; पत्नीचे आक्षेपार्ह फोटो का दाखवले? म्हणत निर्घृण हत्या

तभा. वृत्तसेवा

**बीड** | 'माझ्या पत्नीचे आक्षेपार्ह फोटो का दाखवले? असा जाब विचारत चार मित्रांनी मिळून आपल्याच एका मित्राची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील बेलुरा येथे ही घटना नारायण गडाच्या पायथ्याशी २६ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

या प्रकरणातील मुख्य आरोपी चक्क एक होमगार्ड असल्याने जिल्ह्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, सुमित गवते असे मृत युवकाचे नाव आहे. आरोपी आणि सुमित हे एकमेकांचे मित्र होते. घटनेच्या दिवशी आरोपींनी सुमितला "तुझ्याकडे काम आहे" असे सांगून बोलावून घेतले. मात्र, तिथे पोहोचताच पूर्वनियोजित कटानुसार आरोपींनी त्याच्यावर हल्ला चढवला.



फिर्यादीनुसार, गावातीलच रुस्तुम गोवर्धन गवते, ज्ञानेश्वर दत्ता लाटे, आणि खंबा लिंबा येथील सुरज नागरगोजे या तिघांनी सुमितला घट्ट धरून ठेवले. त्यानंतर गावातीलच त्याचा मित्र रितेश सतीश बहिर याने हातातील धारदार शस्त्राने सुमितच्या अंगावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात सुमितचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणात तत्परता दाखवत एका आरोपीला ताब्यात घेतले असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. रुस्तुम गवते याच्या पत्नीचे आक्षेपार्ह फोटो सुमितने का दाखवले किंवा का पसरवले, या रागातून हा टोकाचा निर्णय घेतल्याचे आरोपीने सांगितले आहे.

या घटनेतील एका आरोपीचा संबंध होमगार्ड दलाशी असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. रक्षकच जर भक्षक बनू लागले, तर सामान्य जनतेने कोणाकडे पाहायचे? बीड जिल्ह्यात गुंडांवरील पोलिसांचा धाक संपला आहे का? असे संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

## एकाच आठवड्यात तीन बालविवाह रोखून नवरदेवासह सात जणांवर गुन्हे दखल

### अल्पवयीन मुलींची सुटका;AHTU पथकाची धडक कारवाई

तभा. वृत्तसेवा

**बीड** | जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (AHTU) पथकाने प्रभावी कारवाई करत एका आठवड्यात तीन बालविवाह उधळून लावत संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी दहीफळ (ता. जि. बीड) येथे १५ वर्षीय मुलीचा बालविवाह होणार असल्याची गुप्त माहिती प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांना मिळाली. त्यानुसार AHTU पथकाने घटनास्थळी धाड टाकत लग्नमंडपात सापळा रचला. वेषांतर करून महिला अंमलदारांनी मुलीला ताब्यात घेतले, तर पुरुष अंमलदारांनी नवरदेवास पकडले. त्यानंतर मंडपातील उपस्थितांना बालविवाह प्रतिबंध कायद्याबाबत जनजागृती करण्यात आली.



पीडित मुलीने दिलेल्या माहितीनुसार तिचा विवाह इरफान बेग अन्सार बेग (वय २४, रा. माळपुरी) याच्यासोबत लावण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी मुलगी, तिचे पालक, नवरदेव व त्याचे पालक तसेच इतर नातेवाईकांना ताब्यात घेऊन पिंपळनेर पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या कलम ९, १०, ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात एकूण १० आरोपींसह १५ ते २० व्हाडी मंडळींचाही समावेश आहे.

दरम्यान, याच दिवशी जोला (ता. केज) येथेही अशाच प्रकारच्या बालविवाहाची माहिती मिळाल्याने पथकाने तात्काळ धाव घेत मुलगी व तिच्या पालकांना ताब्यात घेतले. नवरदेव श्रीकांत जाधव व त्याच्या कुटुंबीयांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यापूर्वी दि. १८ एप्रिल रोजी सोनगाव (ता. जि. बीड) येथे १५ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधितांवर कारवाई करण्यात आली होती.

अशा प्रकारे एका हप्त्यात तीन बालविवाह प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, मागील चार महिन्यांत AHTU बीडने एकूण सात प्रकरणांमध्ये कारवाई केली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत PSI पल्लवी जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मीरा रेडेकर, उषा चौरे, पोलीस हवालदार शोभा जाधव, प्रदीप येवले, अशोक शिंदे तसेच चालक भाऊसाहेब जाधव व अक्षय जाधव यांनी सहभाग घेतला.

जिल्ह्यात बालविवाह विषयी माहिती द्यावी असे आवाहन PSI पल्लवी जाधव यांनी केले आहे.

## मित्रही रामासारखा असावा आणि शत्रू हि रामासारखा असावा ; रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर रामनामाने बंकट स्वामी कीर्तन मंडप मंत्रमुग्ध

तभा. वृत्तसेवा

**बीड** | दि २७ (प्रतिनिधी ) | रामचरित्र हे संसारी जीवासाठी आदर्श आहे यातील प्रभू श्रीराम हा सर्वांगाने परिपूर्ण आहे. त्यामुळे मित्रही रामासारखा आणि शत्रूही रामासारखा असावा असे प्रतिपादन श्री ह भ प रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी केले. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवात दुसऱ्या दिवसाचे कथा पुष्पगुंपताना ते बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे श्री ह भ प नाना महाराज कदम श्री ह भ प सुरेश महाराज जाधव श्रीहब दिनेश महाराज काळे, यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती. महाराजांच्या श्री मुखातून कथा श्रवण करताना भाविक श्रोते मंत्रमुग्ध झाले.तर मंडपामध्ये श्रीराम जय राम जय जय राम चा घोषणांनी मंडप दुमदुमून निघाला.



श्रीक्षेत्र नेकनूर येथे सुरु असलेल्या भव्य पुण्यतिथी सोहळ्यामध्ये दुसऱ्या दिवसाचे कथापुष्पगुंपताना कथा व्यास श्री महाराजांनी प्रभू श्रीराम हा आदर्श राजा आदर्श भाऊ आदर्श मुलगा आदर्श मित्र आणि आदर्श शत्रूही आहे.

समाजामध्ये दुर्जन आहेत म्हणून सज्जना महत्व आहे.खाणी मध्ये गारगोटी आणि कोळसे आहेत म्हणूनच तर एखाद्या हिऱ्याची किंमत आणि महत्व वाढते. जंगलामध्ये चंदनाला किंमत आहे त्याचं कारण त्या जंगलामध्ये बोरी बाभळी सर्व वनस्पती आहेत.. तसं समाजामध्ये खूप मोठ्या प्रमाणात दुर्जन आहेत म्हणूनच तर सज्जनाची किंमत कळते. माणसाने निंदा करायची नाही निंदा करणाऱ्या जवळ सगळी पापे येतात. जीवन जगत असताना सकारात्मक दृष्टिकोन असायला हवा. देश देव आणि धर्म यासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्यांच्या पुण्यतिथी अशा पद्धतीने साजरा होतात.

## चंपावती रत्न पुरस्काराने प्रवीण इंगळे सन्मानित.

तभा. वृत्तसेवा

**बीड.(प्रतिनिधी)** | दिवंगत सामाजिक कार्यकर्ते श्री हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी यांच्या संकल्पनेतून २०२१ साली साकार झालेला "चंपावती रत्न" पुरस्कार विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल देण्याचा मानस त्यांचा होता. श्री हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी यांचे अकाली निधन झाल्यामुळे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले होते.

श्री रेड्डी यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी डॉ संजय तांदळे,(मातृभूमी प्रतिष्ठान चे अध्यक्ष) व सामाजिक कार्यकर्ते प्रवीण पालीमकर यांनी त्यांच्या खांद्यावर घेतली.





डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय २०२५-२६ मातृभूमी रत्न पुरस्कार व रेड्डीने निश्चित केलेला चंपावती रत्न पुरस्कार चे वितरण सोहळा,२४ एप्रिल २०२६ रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते सुशीलाताई मोराळे यांच्या अध्यक्षतेखाली व श्री सतीश साळुंखे, पोलीस निरीक्षक शिवाजीराव जाधवर, शिक्षक नेते उत्तमराव पवार, प्राचार्य सविता शेटे , श्री रेड्डी यांचे भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

हरिसन फ्रान्सिस रेड्डी यांनी प्रवीण इंगळे यांचे सामाजिक चळवळीतील योगदान, निस्वार्थ भावनेने केलेले काम याची दखल घेतली गेली.२०२१ साली त्यांनी प्रत्यक्ष भेटीत प्रवीण इंगळे यांना सांगितले होते.

त्यांच्या अकाली निधनाने हे पुरस्कार रखडले गेले.

त्यावेळेस त्यांच्या सानिध्यात असलेले डॉक्टर संजय तांदळे व सामाजिक कार्यकर्ते प्रवीण पालीमकर रेड्डी यांच्या घरी गेले असता चंपावती रत्न पुरस्काराचे शिल्ड तयार केलेले रेड्डी यांच्या घरी आढळून आले.

आणि तो धागा पकडून संजय तांदळे व प्रवीण पालीमकर यांनी हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांचे अधुरे राहिलेले स्वप्न साकार केले.

प्रवीण इंगळे यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# वाढत्या उन्हात जुन्या यंत्रणेच्या जोरावर महावितरणची 'तारेवरची कसरत'; नवीन ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता

तभा. वृत्तसेवा

**किल्ले धारूर (प्रतिनिधी)** | सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असतानाच धारूर शहराची वीज मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मात्र, ही मागणी पूर्ण करताना महावितरणच्या स्थानिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जुन्या झालेल्या यंत्रणेमुळे मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक वर्षांपूर्वीची उपकेंद्रे आणि विद्युत वाहिन्यांच्या (लाईन्स) जोरावर आजही कर्मचारी अखंडित सेवा देण्यासाठी अहोरात्र कष्ट घेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



धारूर येथील महावितरणची स्थापना झाल्यापासून जी यंत्रणा कार्यान्वित आहे, त्याच संरचनेवर आजचा वाढलेला भार सांभाळला जात आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्राची व्याप्ती लक्षात घेता, जुन्या ट्रान्सफॉर्मरवर मर्यादा येत आहेत. असे असतानाही, तांत्रिक बिघाड झाल्यास महावितरणचे कर्मचारी भर उन्हात उभे राहून दुरुस्ती कामे पूर्ण करत आहेत. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी आपल्या कौशल्याने ही 'तारेवरची कसरत' यशस्वी करत आहेत. शहरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होण्यामागे मुख्य कारण हे कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष नसून, यंत्रणेवरील अतिरिक्त ताण हे आहे. किरकोळ दुरुस्तीला होणारा विलंब हा अनेकदा जुन्या साहित्यामुळे उद्भवतो. जर प्रशासनाने या भागात नवीन आणि उच्च क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिले, तर कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होऊन ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा मिळणे शक्य होईल.

घरगुती ग्राहकांसोबतच शहरातील उद्योग आणि छोट्या व्यवसायांना अखंड विजेची गरज आहे. सध्याची परिस्थिती पाहता, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धारूर येथील पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नवीन ट्रान्सफॉर्मर आणि अद्ययावत विद्युत वाहिन्या मिळाल्यास, कर्मचाऱ्यांना काम करणे सोपे होईल आणि शहराचा विकासही वेगाने होईल, अशी भावना व्यक्त होत आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि जुन्या यंत्रणेच्या जोरावर शहराला प्रकाशमान ठेवणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना आता आधुनिक यंत्रणेच्या खंबीर साथिची गरज आहे.

## कीर्तनाला जाणाऱ्या रिक्षालचालकासह कुटुंबीयांना मारहाण

नेकनूर : वै. व्यंकटस्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरु झालेल्या सप्ताहात कीर्तनाला निघालेल्या रिक्षाचालकासह त्याच्या कुटुंबीयांना मारहाण झाल्याची घटना नेकनूरमध्ये घडली. शनिवारी रात्री नेकनूरच्या बसस्थानकासमोर दुचाकीस्वाराला रिक्षाचा कट बसला या शुल्लक कारणातून दुचाकीस्वार रिक्षाचालकाला अडवून मारहाण करू लागला या रिक्षात बसलेल्या महिला मारहाण होत असल्याचे दिसताच काहींनी धाव घेतली यांनतर हा वाद पोलिस ठाण्यात पोहचला मात्र दोन्ही गट या ठिकाणी जमा झाल्याने ठाण्यासमोरच एकमेकांवर दगडफेक झाली. यानंतर सौम्य लाठीमार करत जमाव पांगवण्यात आला. तसेच बीड येथून पोलिसांची कुमक मागवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

नेकनूरमध्ये अलीकडे रस्त्यावर काही किरकोळ अपघात घडल्यास मोठ्या वादात रुपांतर होण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. असाच प्रकार शनिवारी रात्री आठच्या दरम्यान बसस्थानकासमोर घडला. रिक्षाकडून दुचाकीला कट बसल्याचे कारणाने मोठे स्वरूप घेतले. या रिक्षात असलेल्या महिलांना मारहाण करण्यात येत असल्याचे दिसताच आजूबाजूच्या काहींनी यामध्ये हस्तक्षेप केला. मात्र यानंतर हा वाद वाढत पोलिस स्टेशनकडे गेला.

बघता बघता दोन्ही समाजातील लोकांनी पोलिस ठाण्यासमोर गर्दी केली आणि वादाने मोठे स्वरूप प्राप्त करीत ठाण्यासमोर एकमेकांवर दगडफेक सुरू केली. पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी केज, बीड येथून पोलिसांची कुमक मागवत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. वै. व्यंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी सकाळची अखंड हरीनाम सप्ताह ठप्पा राहिला असून या कीर्तनासाठी जाणाऱ्या रिक्षा चालकासह महिलेला मारहाण झाल्याच्या वृत्ताने नेकनूरमध्ये संतापाची लाट उसळली. यामुळे नेकनूर अशांत झाल्याचे पाहायला मिळाले.

केजचे पोलिस उपअधीक्षक व्यंकटराम हे रात्री नेकनूरमध्ये परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. पोलिसांच्या फिर्यादीवरून दोन्ही गटातील लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेकनूरचा रविवारचा आठवडी बाजार यामुळे बंद राहिला. नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये महिलेच्या फिर्यादीवरून तसेच पोलीस स्टेशन समोर दगडफेक झाल्याने पोलिसांच्या फिर्यादीवरून वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे नोंदवण्यात आले. यातील १० जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी नेकनूर येथे भेट दिली. पुढील तपास उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे करीत आहेत.

**CHANGE OF NAME** सोलापूर तरुण भारत

CHANGE IN NAME
I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
OLD NAME: SHAH MALAN BEGAM HUSEN SHAH
CHANGE IN TO MY NEW NAME :- MALAN JIYAUDDIN INAMDAR
PRESENT ADD : ROZA MOHALLA KAIJ TQ KAIJ, DIST, BEED. 431123, MOB. NO - 9890161586

## सूर्यकांत काळे यांच्यासारख्या शिक्षकांची समाजाला गरज : खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन

### केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांचा सेवागौरव सोहळा थाटात; शैक्षणिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

तभा. वृत्तसेवा

**केज, दि.२६** | केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांनी माळेगावच्या शाळेला पीएमश्री योजनेत स्थान मिळवून देऊन ग्रामविकासात मोठे योगदान दिले. त्यांच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ शिक्षकांची जिल्हा परिषद शाळांना गरज आहे, असे प्रतिपादन खासदार बजरंग सोनवणे यांनी केले.

प्राथमिक शिक्षण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा साळेगाव जिल्हा परिषद प्रशालेतील केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत तुकाराम काळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त माळेगावात गौरवसोहळा झाला.बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते सूर्यकांत व सुरेखा काळे यांचा भव्य पुष्पहार व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. डॉ.संजय शिंदे यांनी सन्मानपत्राचे लेखन तर अरुण शिंदे यांनी वाचन केले. कार्यक्रमास माजी आ.पृथ्वीराज साठे, माजी आ.संगीता ठोबरे, माजी पंस सभापती राजेसाहेब देशमुख, अनुराधा नखाते, नगराध्यक्ष सीता बनसोड, हारुण इनामदार, नबाब इमाम, डॉ.देवेंद्र डोके, बालासाहेब जाधव, बाळकृष्ण भवर, सरपंच कैलास पाटील, माजी मुख्याध्यापक पी के देशमुख,'छावा'चे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे आदीची प्रमुख उपस्थिती होते. सूर्यकांत काळे यांनी गेल्या साडेतीन दशकात जिल्हा परिषद शाळेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल हा गौरव सोहळा होत असल्याचे प्रस्ताविकात मुख्याध्यापक अर्जुन बोराडे म्हणाले. तर हाच धागा पुढे पकडून खासदार बजरंग सोनवणे म्हणाले, सूर्यकांत काळे यांना गेल्या चार दशकांपासून आपण ओळखत असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी त्यांची तळमळ जवळून पाहिली आहे.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २९ व ३० एप्रिल रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी २९ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत २९ एप्रिल रोजी देवणी येथील कै. रसिका महाविद्यालय आणि ३० एप्रिल रोजी जळकोट येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय येथे सकाळी १० वाजता मुलाखती पार पडणार आहेत.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा. लि. ही कंपनी सहभागी होणार असून, त्यांच्या 'टोयोटा कौशल्या' उपक्रमांतर्गत 'शिका आणि कमवा' या तत्त्वावर उमेदवारांची निवड केली जाणार आहे. या संधीसाठी १८ ते २१ वयोगटातील दहावी किंवा बारावी उत्तीर्ण, तसेच पदवी शिक्षण घेत असलेले किंवा पदवीधर उमेदवार पात्र असतील. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम आणि पासपोर्ट फोटो यांच्या तीन प्रतींसह स्वखर्चाने संबंधित ठिकाणी उपस्थित राहावे. या सुवर्णसंधीचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले असून अधिक माहितीसाठी दत्तात्रय कांबळे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२३८४६५) किंवा लहू भंडारे (भ्रमणध्वनी क्र. ८०५५९९२९००) यांच्याशी संपर्क साधावा.



## विविध वृत्त...

### वाढत्या तापमानात आरोग्याची काळजी घ्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** सध्या वातावरणातील बदलांमुळे तापमान सतत वाढत असून हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासूनच राज्याच्या अनेक भागांत कडक ऊन जाणवू लागले आहे. साधारण एप्रिल आणि मे महिन्यांत सन बर्न, हिट कॅम्प्स (स्नायूंना गोळे येणे), हिट एक्झॉर्शन (प्रचंड थकवा) आणि हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारख्या उष्णताविकारांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

उन्हात कष्टाची कामे करणारे मजूर, वृद्ध, लहान मुले, गरोदर महिला, स्थूल व्यक्ती, पुरेशी झोप न झालेले लोक तसेच मधुमेह, हृदयविकार आणि व्यसन असणाऱ्या व्यक्तींना उष्माघाताचा अधिक धोका असतो. याशिवाय घट्ट कपडे बॉयलरजवळ काम करणाऱ्या कामगारांनीही उष्णतेच्या लाटेत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. उष्णतेमुळे होणाऱ्या त्रासाची लक्षणे सौम्य किंवा गंभीर स्वरूपाची असू शकतात. सौम्य त्रासात थकवा, ताप, शरीरावर पुरळ उमटणे, घालणारे नागरिक आणि कारखान्यात चक्कर येणे आणि हाता-पायांना गोळे येणे अशी लक्षणे दिसतात. मात्र, गंभीर स्थितीत त्वचा गरम व कोरडी पडणे, तीव्र डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात पडणे, मानसिक अस्वस्थता आणि बेशुद्धावस्था येऊन मृत्यू ओढवण्याची भीती असते.

## देशी मद्याची तऱ्हाच न्यारी, तळपत्या उन्हात पडलाय तरुण भारी !

**तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. २७ एप्रिल :** कोणत्याही व्यसनाने एकदा का मर्यादा ओलांडली की संबंधित मनुष्य चहूबाजूंनी जणू आयुष्यातून उठतो. सध्या लातुरात तापमानाने चाळीशी केव्हाच ओलांडली आहे. उन्हाच्या तिव्रतेमुळे नागरिकांना कामासाठीही घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. अशा वेळी लातूरच्या मध्यवर्ती बस स्थानकाशेजारी एक तरुण ' देशी प्रेमी ' तरुण तळपत्या उन्हात शुद्ध गमावलेल्या अवस्थेत पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. ते दृश्य पाहून अनेकांना 'देशी मद्याची तऱ्हाच न्यारी, तळपत्या उन्हात पडलाय तरुण भारी !' अशी फक्कड कल्पना सुचल्यास नवल वाटू नये.



व्यसन करणाऱ्या व्यक्तींना कितीही व्यसनमुक्ती केंद्रात ठेवले, मानसोपचार तज्ज्ञांकडून इलाज करून घेतले तरी ती मंडळी आपला हेका सोडायला तयार नसतात, याचा अनुभव कित्येकांनी घेतला आहे. व्यसनापासून एखाद्याला परावृत्त करण्यासाठी देव देवत्यांना साकडे घालणे, एखाद्या मांत्रिकाला दाखविणे , प्रियजनांच्या शपथा घालणे असे एक ना अनेक प्रकार केले जात असल्याचे पाहायला मिळते. व्यसनमुक्ती केंद्रात नेवून ठेवले तरी बरीच मंडळी तेथून बाहेर पडल्यानंतर पुन्हा ' पहिले पाढे पंचावन्न' करताना दिसतात. मुळात कोणतेही व्यसन सोडण्यासाठी व्यसनी व्यक्तीच्या मनाने अगोदर तयारी ठेवणे आवश्यक असते. एखाद्याला व्यसन करू नये म्हणून कितीही पोटतिडकीने सांगितले तरी तो सांगणाऱ्याचे अत्यंत शांतपणे ऐकून घेतो आणि काहीही ऐकलं नसल्याच्या अविर्भावात पुन्हा ' गुत्त्याकडे ' वळतो. अशा व्यक्तींना घर - परिवार - समाज कशाचेही देणे - घेणे नसते. जणू ते आपल्या मस्तीत जगण्यालाच खरे जीवन समजून चालत असावेत, अशी शंका येते.

आजघडीला व्यसन हे केवळ मद्याचेच नाही तर अनेक प्रकारच्या नशेच्या औषधांचेही केले जात असल्याचे पाहायला मिळते. यामध्ये दुर्दैवाने उद्याची भावी पिढी मोठ्या संख्येने गुरफटताना पाहायला मिळते. महाविद्यालयीन युवक प्राधान्याने याला बळी पडत असल्याचे बोलले जाते. लातूरच्या ट्युशन एरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात सर्व प्रकारचे मादक पदार्थ विद्यार्थ्यांना त्याच भागात उपलब्ध करून देणारी टोळीही सक्रिय असल्याचे सान्गण्यात येते. हा प्रकार अतिशय घातक आणि गंभीर नव्हे काय ? ही बाब अल्लड असणाऱ्या विद्यार्थ्यांना आजमितीस गंभीर वाटत नसली तरी पालकांना आपल्या मुलांच्या भवितव्याबद्दल आतापासूनच चिंता वाटत असल्याचे दिसून येते.

सध्या उन्हाच्या तीव्रतेने मनुष्यासह सर्वच प्राणी मात्रांचे प्राण कासावीस होत आहेत. वाढत्या उष्म्यामुळे घराबाहेर पडणेही कठीण असताना सोमवारी दुपारी साधारण एक वाजण्याच्या सुमारास शहरातील मुख्य बस स्थानकाशेजारी असलेल्या रायगड हॉटेलच्या बाजूला , महावितरणच्या डीपी जवलेक तरुण मद्यधुंद अवस्थेत पडल्याचे दृश्य पाहायला मिळाले. त्या तरुणाच्या शेजारी आसपासच्या लोकांनी टाकलेल्या कचऱ्याचाही ढीग साचल्याचे पाहायला मिळाले. कचऱ्याच्या दुर्गंधी शेजारी संबंधित तरुण अगदी आरामात पहुडल्याचे पाहून अनेकांना नवल वाटले. अनेकांनी तो जिवंत आहे की मृत याचीही शहनिशा त्याच्या जवळ जाऊन करण्याचा प्रयत्न केला. जवळ जाऊन पाहिल्यानंतर त्याचा श्र्वासोच्छ्वास चालू असल्याचे प्रस्तुत प्रतिनिधिनेही जाणून घेतले. हे दृश्य पाहून अनेकांनी तरुणांमध्ये सध्या वाढत असलेल्या सर्वच प्रकारच्या व्यसनांबद्दल तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. वाढत्या उन्हामुळे उष्माघाताने मृत्यू पावणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. लातूर जिल्ह्यात रविवारीच औसा तालुक्यातील एका तरुणाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नजीकच्या काळात ती संख्या वाढता कामा नायटे. या भावनेने प्रस्तुत मद्यधुंद तरुणांबद्दल तात्काळ लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना या प्रकाराची माहितीही दिली. असे प्रकार रोखण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनीच आता पुढे येण्याची आवश्यकता असल्याचे बोलले जात आहे.

### लातुरात दोघांना जीवे मारण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** किरकोळ कारणावरून भावासोबत सुरू असलेले भांडण सोडविण्यास गेलेल्या फिर्यादीला व त्याच्या भावाला कात्री पोटात खुपसून, बरगडीवर मारून गंभीर जखमी केल्याची घटना शहराच्या इस्लामपुरा भागातील एका पानटरीवर शुक्रवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली.

याप्रकरणी चार आरोपींविरोधात खुनाचा केल्याचा दाखल आला आहे. गुन्हा करण्यात

आरोपी रेहान मक्कासाब शेख व फिर्यादी शाहीद दस्तगीर शेख यांचा भाऊ शादब यांचा किरकोळ कारणावरून वाद सुरू होता. ते भांडण सोडविण्यास फिर्यादी शाहीद शेख गेले. त्यावेळी चिडलेल्या आरोपी रेहान मक्कासाब शेख याने फिर्यादीच्या डाव्या बरगडीवर व डाव्या दंडावर कात्रीने भोसकण्याचा प्रयत्न

केला. त्याचप्रमाणे शादब शेख याला जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच आरोपीने पोटात कात्रीने भोसकून गंभीर जखमी केले. अन्य आरोपी जावेद शेख, रहेमतुल्ला मक्कासाब शेख व मक्कासाब शेख यांनी फिर्यादी व त्याचा गंभीर जखमी झालेला भाऊ शादब यांना लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. यातील जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी शाहीद मक्कासाब शेख यांच्या फिर्यादीवरून चार आरोपींविरोधात गुरनं. २७८/२६ कलम १०९ (१), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१ (२), (३), ३ (५) भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक वसंत मुळे हे करीत आहेत.

## महापुरुषांच्या अवमानातून दंगलीचे षडयंत्र : प्रा.भिंगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** शिव-अहिल्यादेवी-फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठेंच्या या भूमीत विघटनवादी शक्ती वाढत आहेत. महापुरुषांचा अवमान करून दंगली घडविण्याचे षडयंत्र सुरू आहे. मुख्यमंत्री भांडणे लावण्यास प्रवृत्त करीत आहेत, असा आरोप काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे यांनी रविवारी (दि.२६) पत्रकार परिषदेत केला.




पुणे येथील महात्मा फुले यांच्या समता भूमीला वंदन करून २० एप्रिलपासून काँग्रेस ओबीसी विभागाच्यावतीने राज्यात समता यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी ही यात्रा लातुरात पोहचली. यात्रेचे स्वागत करण्यात आले. यानंतर काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

प्रा. भिंगे म्हणाले, समाज, देशाचा विचार करणारी माणसं आता राजकारणातून जवळपास परागंदा झाली आहेत. म्हणून आज यापूर्वी कधीच लागला नव्हता, तो एक भस्मारोग महाराष्ट्राच्या राजकारणाला लागला आहे. त्याचे कारण आजची सत्ता आहे. कोणत्याही परिस्थितीत भावात भाऊ, गावात गाव, पक्षात पक्ष न ठेवता सातत्याने आम्हीच सत्तेत राहू, ही मानसिकता बनली आहे. सगळ्यात भीषण वाक्य म्हणजे, 'मी पुन्हा येईन' हे आहे. त्यांच्याएवढे त्वेषेने पछाडलेले राजकारणी दुसरे नाहीत. तीन वेळेला सत्ता येते, तिन्ही वेळेला सांगायचे की, आमचा डीएनए ओबीसीचा असल्याचे सांगितले जाते, ओबीसी-मराठा वाद लावण्याचे काम सुरू आहे, ते म्हणाले.

अहिल्यादेवींना धर्म रक्षक म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला अहिल्यादेवींनी बांधलेला १७९१ मधला काशीचा मनकर्णिका घाट बुलडोजरने पाडायचा, हे दुटप्पी धोरण सरकार करीत आहे. त्याचा नुसता निषेध करणार नाही तर तो समाजापुढे आम्ही मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे ते म्हणाले.

पत्रकार परिषदेस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, नगरसेवक किरण जाधव, ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रा. एकनाथ पाटील, महापालिकेतील गटनेते विजयकुमार साबदे, व्यंकटेश पुरी, प्रवीण सूर्यवंशी, प्रवीण कांबळे, शरद देशमुख उपस्थित होते.

## समाज कल्याण विभागांतर्गत निधी प्रमाणपत्रांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दि २३ एप्रील २०२६ वार गुरुवार रोजी खरेदी-विक्री संघ मुरुड येथे निधी व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमंत (बापू) नागटिळक उपसरपंच ग्रामपंचायत , मुरुड हे होते.

जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, लातूर यांच्यावतीने दिव्यांग निधी अंतर्गत दिव्यांगांना शेळी गट, पिठाची गिरणी, चटणी कांडप व इतर साहित्य तसेच २० टक्के शेष फंडातून मागासवर्गीय महिला व पुरुष बचत गटासाठी रोजगार करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात असतो. सदरील योजना लकी ड्रॉ पद्धतीने लाभार्थींची निवड केली जाते. मुरुड येथील शेळी गटासाठी ४ लाभार्थ्यांची मिरची कांडप साठी २ लाभार्थीची व पिठाच्या गिरणीसाठी १ लाभार्थीची निवड झाली तसेच ३ महिला बचत गट व २ पुरुष बचत गट यांची निवड झाली होती. त्या माध्यमातून ३ लाख ५० हजार रुपयांचा निधी मुरुड जिल्हा परिषद गटास मिळाला आहे.

या कार्यक्रमात उत्तमराव माने (सभापती समाज कल्याण जिल्हा परिषद, लातूर) यांच्या हस्ते सदरील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व निधी वाटप करण्यात आला. श्रीपती माळी (उपसरपंच ग्रामपंचायत, मुरुड) पंकज गायकवाड (पंचायत समिती सदस्य, लातूर) संतोष शिंदे (ज्येष्ठ नेते) भक्तावर बागवान (ज्येष्ठ नेते) आकाश कणसे (उपसरपंच ग्रामपंचायत मुरुड) गौतम (बप्पा) लांडगे सतीश अंधारे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश मिसाळ, मोहित डोळसे, बाळू गाडे, मयूर काळुंखे, मयूर सुरवसे, राहूल कांबळे, रवी उबाळे, अमर सुरवसे, सतीश हिंगे, प्रणव गाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सौ जयश्री तवले (जिल्हा परिषद सदस्या, मुरुड गट- लातूर) लक्ष्मीकांत तवले (अध्यक्ष कै. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार प्रतिष्ठान मुरुड) यांनी केले होते.

### मल्हार फाऊंडेशनतर्फे डॉ. यशपाल भिंगे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे व काँग्रेस ओबीसी लातूर जिल्हा अध्यक्ष प्राचार्य एकनाथ पाटील, काँग्रेस ओबीसी लातूर जिल्हा उपाध्यक्ष रघुनाथ मदने यांचा मल्हार फाउंडेशन लातूर यांच्या वतीने होळकर शाहीचे व माळवा प्रांताचे मराठी साम्राज्याचे विस्तारक संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर, प्रजाहितदक्ष महाराणी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर, महायोद्धा महापराक्रमी महाराजा यशवंतराव होळकर यांची संयुक्त प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

### दिशा प्रतिष्ठानचा सहावा वर्धापन दिनानिमित्त मोफत शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** मानवतेच्या सेवेचा वसा जपत शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या दिशा प्रतिष्ठानच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात व यशस्वीरित्या पार पडले.

दि. २१ मार्च ते २१ एप्रिल या कालावधीत आयोजित या शिबिरासाठी दररोज सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत क्रीडा संकुल, लातूर येथील दिशा प्रतिष्ठानच्या मुख्य कार्यालयात नोंदणी करण्यात आली होती. शिबिरात अँजिओप्लास्टी, कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, मुतखडा, मणक्याचे आजार तसेच ब्रेन ट्यूमर यांसारख्या गंभीर आजारांवर १००% मोफत शस्त्रक्रिया (औषधांसह) करण्यात आल्या. अँजिओग्राफीसाठी मात्र ५००० शुल्क आकारण्यात आले.

तसेच हाडे, डोळे, कान-नाक-घसा, जनरल व स्त्रीरोग शस्त्रक्रियांवर ५०% सवलत (औषधाविना) देण्यात आली. शस्त्रक्रिया सह्याद्री हॉस्पिटल, पोद्दार हॉस्पिटल, काळे हॉस्पिटल, गोरे हॉस्पिटल, सारडा हॉस्पिटल, सिग्मा आय हॉस्पिटल व हार्मोनी हॉस्पिटल येथे करण्यात आल्या. याशिवाय रक्त तपासणी, सीटी स्कॅन व एमआरआय तपासण्या ५०% सवलतीत उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमातून एकूण ६१ रुग्णांच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून रुग्णांनी दिशा प्रतिष्ठानप्रती कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले.

## पशु पालकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक : जिल्हाधिकारी बास्टेवाड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** पशुपालकांना वेळेवर उपचार, रोगप्रतिबंधक लसीकरण आणि आधुनिक पशुपालन व्यवस्थापन यावर भर देण्याची गरज आहे. पशुपालकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच श्र्वानांचे निर्बीजीकरण करून लातूर जिल्हा रेबीजमुक्त करण्याचे आवाहनही लातूरचे जिल्हाधिकारी तथा पशुवैद्यक डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.



जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त लातूर येथे पशुसंवर्धन विभाग, लातूर व एमएसडी यांच्या संयुक्त विद्यमाने 'पशुवैद्यक अन्नसुरक्षा व सार्वजनिक आरोग्याचे रक्षक' या विषयावर जिल्हास्तरीय तांत्रिक परिसंवाद उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पशुवैद्यकांचा विशेष सन्मान कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पशुवैद्यकांचा विशेष सन्मान करण्यात आला. यात डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. विजय जाधव, डॉ. भास्कर बोरगावकर, डॉ. नेताजी शिंगटे, डॉ. राम हुडगे, डॉ. वसंत गुळवे, डॉ. सूर्यकांत नागरगोजे, डॉ. मधुकर बोरुळे, डॉ. धीरज मानकरी व डॉ. आला. महादेव जगताप यांचा गौरव करण्यात जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड बोलत होते. यावेळी प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, कर्नाटक पशुवैद्यकीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. शिवशंकर उस्तूरगे, कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, देवणी गोवंश संघटनेचे डॉ. भास्कर बोरगावकर,

ज्येष्ठ पशुवैद्यकीय शाखज्ञ डॉ. अनिल भिकाने, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. भिकाने म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेत पशुवैद्यकांचे योगदान अत्यंत मोलाचे असून अन्नसुरक्षा, अन्न सुरक्षितता व सार्वजनिक आरोग्याचे खरे रक्षक म्हणून पशुवैद्यकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

यावेळी प्रा. डॉ. ठोंबरे म्हणाले, पशुवैदक, शेतकरी, पशुपालक व शाखर यांनी पशुधनाच्या पैदास, आहार, व्यवस्थापन व आरोग्य या बाबत भविष्यवेध घेउन गुणात्मक व संख्यात्मक पशुधन वृद्धीतुन पशुपालक आत्मनिर्भर होण्यासाठी संयुक्त प्रयत्न करावेत. तसेच डॉ. सोनवणे व डॉ. बोरगावकर यांनी समयोचित मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजकुमार पडिले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले. त्यांना डॉ. समीर सास्तुरकर यांनी सहकार्य केले. आभार प्रदर्शन डॉ. सुधाकर साळवे यांनी केले.

कार्यक्रमास एमएसडीचे प्रक्षेत्र व्यवस्थापक कुणाल घुगांडे यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील १५० हून अधिक पशुवैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, खाजगी पशुवैद्यक, उद्योजक व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डंख छोटा, धोका मोठा : डासांद्वारे पसरणाऱ्या आजारांविरुद्ध जनजागृती उपक्रम

## जागतिक हिवतापदिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** हिवताप दुरीकरणासाठी कटिबद्ध-आता हे शक्य आहे, आता हे केलेच पाहिजे' या घोषवाक्याखाली राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात जागतिक हिवताप दिन विविध आरोग्य संस्थांमध्ये साजरा करण्यात आला. हिवताप या डासांद्वारे पसरणाऱ्या आजाराविरुद्ध जनजागृती करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.




जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. एस. व्ही. पवार म्हणाले की, हिवतापावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासकीय यंत्रणेसोबतच लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास हिवतापाचा पूर्णतः पराभव शक्य आहे. हिवताप नियंत्रणाबाबत सकारात्मक चित्र दिसून येत असून मागील काही वर्षांत रुग्णसंख्येत लक्षणीय घट झाली आहे. सन २०२० मध्ये २, ९९,१८८ रक्तनमुने तपासून ७ रुग्ण आढळले होते. २०२१ मध्ये २, ६४,०२५ नमुन्यांत १ रुग्ण आढळला तर २०२२ व २०२३ मध्ये अनुक्रमे ३,७०,४२९ व ४,४०, २२८ नमुन्यांमध्ये एकही रुग्ण आढळला नाही. २०२४ व २०२५ मध्येही अत्यल्प किंवा शून्य रुग्ण नोंदवले गेले असून जिल्हा हिवतापमुक्तीकडे वाटचाल करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट झाले आहे.

हिवताप हा 'प्लाझ्मोडियम' परोपजीवी जंतूमुळे होणारा आजार असून तो ऑनॉफिलीस जातीच्या मादी डासांमार्फत पसरतो. थंडी वाजून ताप येणे, डोकेदुखी, उलट्या, घाम येणे ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी रक्ततपासणी करून निदान केल्यास उपचार शक्य आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये व जिल्हा रुग्णालयात तपासणी व औषधोपचार मोफत उपलब्ध आहेत.

यावेळी नागरिकांना वैयक्तिक व सामाजिक स्तरावर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. अंगभर कपडे घालणे, मच्छरदाणीचा वापर, डासप्रतिबंधक साधनांचा उपयोग करणे, तसेच घराभोवती पाणी साचू न देणे, गटारी स्वच्छ ठेवणे, पाण्याचे साठे नियमित रिकामे करणे आदी उपाय महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

उपजल्हि रुग्णालय, उदगीर येथे झालेल्या मुख्य कार्यक्रमाला सहसंचालक आरोग्य सेवा डॉ. प्रेमचंद कांबळे, सहाय्यक संचालक डॉ. बालाजी बरुरे, सहाय्यक संचालक डॉ. मोनिका पाटील, डॉ. देशपांडे, डॉ. राठोड, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संजय पवार तसेच बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन अखिल कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. संजय पवार यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोहा तालुक्यात जलजिवन योजनेचा बोजवारा ; ९८ गावापैकी केवळ १० गावांत नळाने पाणी उपलब्ध

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ एप्रिल -**

हर हर घर.. नल का जलचा नारा देत जल जीवन मिशन योजने अंतर्गत लोहा तालुक्यात ९८ गावांसाठी जलजिवन योजना मजुर झाली.या योजनेत कोट्यवधी रुपयांचा शासन स्थरावरुन निधी मंजूर झाला. प्रत्यक्षात आजही अनेक गावांतील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकती करावी लागते, या योजनेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र बघायला मिळत आहे. लोहा तालुक्यातील ५३ गावांमध्ये विहीर व बोअर अधिग्रहण करण्यात आले पण आजुनही पाणीपुरवठा सुरळीत झालेला नाही. अनेक ठिकाणी पाईपलाईनचे अर्धवट काम आसल्यामुळे काम बंद पडले आहे, तर काही गावांमध्ये जलकुंभ अपूर्ण अवस्थेत उभे आहेत. अनेक गावात मोटारपंप धूळ खात पडलेले आहेत, अनेक ठिकाणी नळ कनेक्शनच देण्यात आलेले नाही. काही गावांमध्ये घराघरात नळजोडणी दिल्याचा दावा करण्यात आला असला तरी नळातून आजपर्यंत पाण्याचा थेंबही आलेला नाही.योजना माञ कागदावर पूर्ण झाल्याचा या विभागामार्फत दावाकेला जात आहे , प्रतेक्षात माञ नळ कोरडेच दिसुन येत आहेत!



अनेक गावातील नागरिकानी सतप्त प्रतिक्रीया व्यक्त केली . या विभागाने गाजावाजा करत या योजनेची अंमलबजावणी सुरू केली. गावातील डोर टु डोर पाइपलाइन टाकणे, डोर टू डोर नळजोडणी देणे अशी प्राथमिक कामे करण्यात आली; मात्र त्यानंतर निधीअभावी आर्धवट कामे थांबली. गुत्तेदाराने नाराजी व्यक्त केली.या योजनेचा दोन वर्षांचा कालावधी उलटूनही योजना पूर्णत्वास न गेल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. अनेक गावांमध्ये पाइपलाइनच्या कामासाठी गावतील सिसी रस्ते उकडून टाकण्यात आले आहेत , पावसाळ्यामध्ये त्या रस्त्यवरुन सामन्या व्यक्तीन चालणे अशक्ये आहे. अनेक गावात बोगस कागद पत्रावर कामे दाखवून निधी उचलल्याचेही आरोप होत आहेत, या संपूर्ण योजनेच्या कामाची सखोल चौकशी करून गुत्तेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी नागरिकांकडून मागणी जोर धरत आहे. प्रत्यक्षात तालुक्यातील जलजिवन कामाची पाहणी केल्यास अनेक कामांचे पितळ उघड होईल, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

डलीशअनेक गावात ूजोडणी नसल्यामुळे काही गावच्या योजना बंद आहेत

उन्हाळी पाणी पुरवठा योजनेचे उपकार्यकारी अभियंता दिपक बनसोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोहा तालुक्यात एकूण ९८ कामे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ १० गावांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. १५ गावांमध्ये वीज कनेक्शन नसल्यामुळे योजना बंद आहे. उर्वरित गावांमध्ये काही ठिकाणी २५ टक्के, काही ठिकाणी ५० टक्के तर काही ठिकाणी ७० टक्के काम पूर्ण झाले असून, हाडोळी (ज.), घोटका या दोन गावांत काम सुरू आहे. उर्वरित गावांमध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे पुढील कामे ठप्प असल्याचे त्यांनी सांगितले.

## १८ तास अभ्यास उपक्रमातून डॉ.आंबेडकरांना आदरांजली

**मुदखेड** -महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून मुदखेड शहरातील भिमनगर येथील सार्वजनिक भीम जयंती मंडळाच्या वतीने १८ तास अभ्यास उपक्रमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

दि. २४ एप्रिल रोजी मुदखेड नगरपरिषद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय येथे १८ तास अभ्यास उपक्रमाचे आयोजन सार्वजनिक भिमजयंती मंडळाच्या वतीने ठेवण्यात आला होता. या उपक्रमाचे उद्घाटन भंते गगनबोधी ( बौद्ध भूमी प्रशिक्षण केंद्र मुदखेड) व सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.आर. कांबळे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले,यावेळी नगरसेवक अविनाश चौदंते,ड.अमोल भुरे, न.प.ग्रंथपाल रमेश सावंत,अमोल चौदंते, परीक्षक उपा.डी.जी चौदंते,संजय डोंगरे सर, शंकर लोकडे,समता सैनिक दलाचे बालकृष्ण चौदंते, राजन डोंगरे, राजु चौदंते, रतन चौदंते, सुचिताताई गोवंदे, त्रिशलाताई आठवले यांची उपस्थिती होती. या उपक्रमात एकूण ३२ वाचकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी विविध विषयांवरील पुस्तके वाचून ज्ञानार्जन केले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजात वाचन संस्कृतीला चालना देणे, अभ्यासाची सवय रुजवणे आणि युवकांमध्ये विचारप्रवर्तक दृष्टिकोन विकसित करणे हा होता. बाबासाहेबांनी दिलेल्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मूलमंत्राचा प्रत्यय या उपक्रमातून स्पष्टपणे दिसून आला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते,उपाध्यक्ष अमोल सरोदे,कोषाध्यक्ष संतोष चौदंते,सचिव अमोल चौदंते,सहसचिव सोनू चौदंते,सल्लागार गजू चौदंते,यांच्यासह मंडळाचे सर्व सदस्य व संजय डोंगरे सर, शंकर लोकडे, यांनी परिश्रम घेतले.

## नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या तालुका कार्यकारणी बरखास्त

**नांदेड**- नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माहूर आणि अर्धापूर तालुका कार्यकारणी वगळता जिल्ह्यातील इतर सर्व तालुका कार्यकारणी बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मान्यतेने आणि जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, कार्याध्यक्ष अनिल कसबे यांच्या आदेशान्वये हा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच या सर्व तालुका कार्यकारणी नव्याने गठीत करण्यात येतील, अशी माहिती पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस अनुराग पोवळे यांनी दिली आहे. नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे वेगवेगळे प्रश्न सोडविले जातात. जिल्हा पत्रकार संघाच्या अर्धापूर आणि माहूर तालुका कार्यकारणी वगळता इतर सर्व तालुका पत्रकार संघाची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे कार्यरत असलेल्या या सर्व तालुका कार्यकारणी बरखास्त करण्यात येणार आहेत. जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे आणि कार्याध्यक्ष अनिल कसबे यांच्या आदेशानुसार या सर्व कार्यकारणी बरखास्त करण्यात आल्या आहेत. नव्याने गठित झालेली अर्धापूर आणि माहूर तालुका कार्यकारणी या निर्णयातून वगळण्यात आली आहे. बरखास्त झालेल्या सर्व तालुका कार्यकारणींचे नव्याने गठन करण्यात येणार आहे. नव्या कार्यकारिणीचे जिल्हास्तरावरून निरीक्षक पाठवून गठन करण्यात येणार आहे. स्थानिक पातळीवरील जिल्हा पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून या कार्यकारिणी निवडण्यात येतील, असेही जिल्हाध्यक्ष पांडागळे यांनी सांगितले. त्याचवेळी नांदेड जिल्हा डिजिटल मीडियाच्या देगलूर आणि कंधार या तालुका कार्यकारणी वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये नव्याने कार्यकारणी गठीत करण्यात येणार आहेत. यासाठीही जिल्हास्तरावरून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष मुजीब शेख यांनी दिली. जिल्हा पत्रकार संघाच्या तालुका कार्यकारणी तसेच डिजिटल मीडिया कार्यकारणी निवडी लवकरच करण्यात येणार आहेत. त्याचवेळी जिल्हा पत्रकार संघाची सदस्य नोंदणीही लवकरच सुरू केली जाणार आहे. या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी याची नोंद घ्यावी, त्याच वेळी कार्यकारणी बरखास्त करण्यात आलेल्या तालुका कार्यकारिणी कोणत्याही स्वरूपात कार्यरत राहणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हास्तरावरून लवकरच तालुका कार्यकारणी निवडण्यासाठी निरीक्षकांची घोषणा केली जाईल, असेही जिल्हा सरचिटणीस अनुराग पोवळे यांनी सांगितले आहे.

## रस्ता न मिळाल्याने कमठाला येथे शेतकऱ्यांचे उपोषण

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २७ एप्रिल -**

तालुक्यातील मौजे कमठाला येथील शेतरस्त्याच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांनी अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. तहसील प्रशासनाच्या आदेशानंतरही प्रत्यक्षात रस्ता खुला करण्यात आलेला नसल्याने हा प्रकार घडला आहे.

मौजे कमठाला येथील गट क्रमांक ५३ मधून गट क्रमांक ५७ पर्यंत जाणाऱ्या पाऊलवाट प्रकरणी तहसीलदारांनी २४ फेब्रुवारी २०२६ रोजी आदेश दिला होता. संबंधित प्रतिवादींनी ऊस पीक काढून झाल्यानंतर, म्हणजे १५ एप्रिल २०२६ नंतर रस्ता मोकळा करून देण्याचे निर्देश या आदेशात देण्यात आले होते. अर्जदार कल्पना गणेश कल्याणकर (रा. पांढरवाडी, ता. मुदखेड) व मनोजकुमार



आनंदराव पानपट्टे (रा. माळवाकत, ता. महागाव) यांनी तहसीलदारांकडे निवेदन देत नकाशावरील रस्ता मिळावा तसेच दोन वर्षांच्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी केली होती. यासाठी त्यांनी प्रशासनाला २७ एप्रिलपर्यंत मुदत दिली होती.

दरम्यान, समाधानकारक कार्यवाही न झाल्याने अर्जदारांनी तहसील कार्यालय किनवट समोर उपोषणास सुरुवात केली आहे. या प्रकरणाची प्रत महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व पोलीस प्रशासनाला देण्यात आली असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

# यशवंतराव देशपांडे स्मृती संगीत महोत्सवाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ एप्रिल -**

तबला आणि शास्त्रीय गायन क्षेत्रात निष्ठेने कार्य करणारे कै. पं. यशवंतराव देशपांडे यांच्या जन्मदिनी, २९ एप्रिल रोजी, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ काबरानगरातील श्रीकृष्ण मंदिर परिसरात सायंकाळी ७ वा. संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या वषार्पासून देशपांडे सरांचे कुटुंबीय, विद्यार्थी आणि शुभचिंतक यांच्या पुढाकारातून हा महोत्सव साजरा केला जात असून, यामागचा मुख्य उद्देश नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे.



या वर्षीच्या महोत्सवात तबल्याचे ज्येष्ठ कलाकार प्रशांत गाजरे यांचा तबला सोलो कार्यक्रम सादर होणार आहे. त्यांना लेहरावर मंगेश जवळेकर साथ देणार आहेत. तसेच शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील तरुण कलाकार मयांक परळीकर आणि अभिराम परळीकर यांची जुगलबंदी हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरणार आहे. या सादरीकरणाला तबल्यावर प्रशांत गाजरे यांची साथ लाभणार असून, गायनासाठी विश्राम परळीकर स्वत: साथ करणार आहेत.

कै. पं. यशवंतराव देशपांडे यांनी आयुष्यभर नव्या कलाकारांना प्रोत्साहन देण्याचा ध्यास घेतला होता. त्यांच्या या विचारांची परंपरा जपत, हा संगीत महोत्सव नवोदितांना संधी देण्याच्या उद्देशाने आयोजित केला जात आहे.

नांदेडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमास प्रतिसाद द्यावा आणि नव्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन सुमंत देशपांडे, सुहास देशपांडे, प्रमोद देशपांडे व संयोजन समितीच्यावतीने वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय जनगणना प्रशिक्षणाची नायगावात यशस्वी सांगता ; सुरुवातीच्या अडचणींवर प्रशासनाचा मात

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २७ एप्रिल -**

देशातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि व्यापक स्वरूपाच्या राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेअंतर्गत नायगाव तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्याची यशस्वी सांगता झाली आहे. दि. २४ ते २७ एप्रिल दरम्यान तालुका स्तरावर हे प्रशिक्षण पार पडले.

दर दहा वर्षांनी होणाऱ्या राष्ट्रीय जनगणनेच्या पार्श्वभुमी वर राज्य शासनाच्या आदेशान्वये प्रशिक्षण तीन टप्प्यांत आयोजित करण्यात आले आहे.

नायगांवच्या तहसील कार्यालयाच्या सभागृहात तालुका दंडाधिकारी सौ. धम्मप्रिया गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व



नायब तहसीलदार सतीश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

या प्रशिक्षणात एकूण १०० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये ८६ पुरुष व १४ महिलांचा समावेश असून, पुढील जनगणना प्रक्रियेसाठी प्रगणक, सुपर वायझर व प्रशिक्षणार्थ्या सह ३०६ जणांचा समावेश करण्यात आला आहे. उद्धव ढगे, कपिल गारटे आणि सचिन तेहरा यांनी साधन व्यक्ती म्हणून प्रशिक्षणार्थींना सखोल मार्गदर्शन केले.

दरम्यान, प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी पिण्याचे पाणी व इतर भौतिक सुविधांच्या अभावामुळे प्रशिक्षणार्थ्यां मध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर अपुऱ्या व्यवस्थेमुळे काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. परिणामी, त्या दिवशीचे प्रशिक्षण नियोजित वेळेपेक्षा लवकर आटोपावे लागले.

मात्र, प्रशासनाने या त्रुटीची तातडीने दखल घेत पुढील सत्रांमध्ये आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे उर्वरित प्रशिक्षण सत्रे सुरळीत व पूर्ण वेळेत पार पडली. महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनीही यामध्ये समन्वय साधत नियोजनबद्ध पद्धतीने काम केले.

नायगांव तालुक्यातील एकूण ८९ गावांचा समावेश असलेल्या या जनगणना प्रक्रियेसाठी हे प्रशिक्षण महत्त्व पूर्ण ठरणार आहे. तर दुसरा टप्पा दि. २८, २९ एप्रिल व २ मे रोजी, तिसरा टप्पा दि.३,४,५ मे रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

एकूणच, सुरुवातीच्या अडचणींवर मात करत नायगांवा तील जनगणना प्रशिक्षणाचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला असून, पुढील टप्प्यांसाठी प्रशासन सज्ज असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# जिद्दीचा झेंडा राष्ट्रीय पातळीवर! रुजूल गोणेवार महाराष्ट्रात अव्वल

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २७ एप्रिल -**

लीप फॉर वर्ड आयोजित वर्ड पावर चॅम्पियनशिप २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत इस्लापूरच्या रुजूल मोहन गोणेवार याने उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्रातून प्रथम तर देशातून चौथा क्रमांक पटकावला आहे. पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत मिळवलेल्या या झंझावाती यशामुळे संपूर्ण परिसरात अभिमानाची लाट उसळली आहे.

रुजूलने मागील दोन वर्षांपासून सातत्याने अभ्यास करत आपली पायाभरणी मजबूत केली होती. विशेष म्हणजे मागील तीन महिन्यांपासून त्याने घेतलेली कठोर मेहनत, शिस्तबद्ध तयारी आणि जिद्दीची पराकाष्ठा यामुळेच हे यश शक्य झाले. स्पर्धेतील कडवी स्पर्धा पार करत त्याने राज्यात अव्वल स्थान मिळवले आणि देशपातळीवरही चौथा क्रमांक पटकावत आपल्या गुणवत्तेची ठळक छाप सोडली.

प्रत्येक पालक आपल्या मुलाने प्रथम यावे अशी अपेक्षा बाळगतो; मात्र रुजूलने केवळ अपेक्षा नव्हे तर प्रामाणिक प्रयत्न,



चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ते वास्तवात उतरवले. या यशामागे मार्गदर्शक इर्शाद पांडे सरांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण पाठबळ लाभले, हे विशेष नमूद करावे लागेल.

रुजूलच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे इस्लापूरसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही तो अशीच उंच भरारी घेईल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## जागतिक हिवताप दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ एप्रिल -**

दि.२५ एप्रिल जागतिक हिवताप दिन निमित्त नांदेड येथे जनजागरण रॅली काढण्यात आली. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार,जिल्हा हिवताप अधिकारी डॉ अमृत चव्हाण,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ हनुमंत रिठे,शहर क्षयरोग अधिकारी डॉ बद्दीओदीन यांच्या हस्ते जागतिक हिवताप दिन महात्मा गांधी पुतळा पासुन ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत रॅलीस हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली.

यावेळी सहाय्यक अधिक्षक विजय चव्हाण,आरोग्य पर्यवेक्षक संजय भोसले,गंगाधर गनलेवार, आरोग्य निरीक्षक माधव कोल्हे,सत्यजीत टिप्रेसवार, व्यंकटेश पुलकंठवार, बालाजी निलपत्रेवार,अरुण आळणे, सुरेश आरगूलवार, मनोहर खानसोळे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विलास नाईक, सचिव दळवी,राजु शेट्टे, वैभव कौशल्ये,आरोग्य कर्मचारी पुष्पराज राठोड, गणेश भुसा, प्रभाकर मुंगल, व्यंकटी बकाल,भारत हांम्पले, उत्तम कराड, व्यंकट मोरे, अनिल सुर्यवंशी,यासीन शेख,चंद्रभान धोंडगे,सुनिल बगाटे, विष्णूदास गलपवाड, संजय कळसे,रणखांब,पवार सहभागी होते.

# अर्धापूरात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २७ एप्रिल -**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती रविवारी (ता.२६) अर्धापूर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण अर्धापूर नगर पंचायतचे लोकप्रिय नगरसेवक सोनाजी सरोदे यांच्या हस्ते करण्यात आले.समता सैनिक दलाने पंचशील ध्वजाला मानवंदना दिली.

शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथील प्रज्ञा बौद्ध विहारात महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष प्रविण देशमुख हे होते तर प्रमुख व्यक्ते म्हणून प्रा.राम वाघमारे, आकाशवाणी नांदेडचे निवेदक मिलिंद व्यवहारे यांनी समाज बांधवांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष अँड किशोर देशमुख,उपनगराध्यक्ष मुक्तदेरखाँ पठाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णूकांत क-हाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक चित्तरंजन ढेमकेवाढ, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, नगरसेवक राजु शेटे, बाबुराव लंगडे, व्यंकटराव राऊत, मुसबिर खतिब,विराज देशमुख, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल वानखेडे, माजी उपसरपंच सुनील देशमुख वाळकीकर, भाऊरावचे संचालक व्यंकटराव साखरे, अर्धापूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गुणवंत विरकर, डॉ.विशाल लंगडे, युवानेते अभिषेक गुरखेल,

कामाजी अटकोरे, ज्येष्ठ पत्रकार सुभाष लोणे, अँड.नितेश लोणे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, बाळू माटे, गौरखनाथ राऊत, भाजपाचे अनुसूचित जाती



मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विलास साबळे, गोपाल पंडित, बालासाहेब देशमुख आंबेगांवकर, माजी नगराध्यक्ष सौ.प्रणिता सरोदे, वंचितचे दिपक मगर,शिवहार घोडेकर,शेख जुबेर यांची उपस्थिती होती.

उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार पुस्तके, ग्रंथ भेट देवून करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्धापूर तालुका सार्वजनिक भिमजयंती मंडळाचे अध्यक्ष उमाकांत सरोदे यांनी करून जयंतीनिमित्त घेतलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली.

सुत्रसंचलन जयंती मंडळाचे उपाध्यक्ष भिमराव सरोदे पेंटर यांनी केले तर आभार विलास सरोदे यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेंद्र सरोदे, जयभिम सरोदे, प्रशांत कांबळे, अरविंद कांबळे, गुणवंत सरोदे, प्रकाश सरोदे, विठ्ठल सरोदे, राजेंद्र साबळे, मारोती कांबळे, रूपेश कांबळे, सदाशिव गायकवाड, निखिल कांबळे, शुभम सरोदे, गौतम सरोदे, संतोष बहाद्दूरे, प्रवेश सरोदे,पंकज सरोदे यांनी परिश्रम घेतले आहे.

## बोलोरो पिकपच्या धडकेत मिरवणूकीत सहभागी तरुणाचा मृत्यू

**भा वृतसेवा**
**ोकर, दि. २७ एप्रिल -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ायंती मिरवणुकीत सहभागी ासलेल्या एका तरुणाचा भरधाव ोलेरो पीकअपच्या धडकेत मृत्यू ाला तर एक गंभीर जखमी ाल्याची घटना दि. २६ एप्रिल ोजी घडली.

दि. २६ एप्रिल रोजी रात्री ाऊच्या दरम्यान शहीद प्रफुल नगर ाथून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक ाहरातील डॉक्टर बाबासाहेब ांबेडकर चौक येथे जात असता ड्डाण पुलावर भोकर कडून नांदेड कडे जाणाऱ्या एम. एच. २६ सी. च. ३७४१ या बोलोरो पिकपने मिरवणुकीतील तरुण संदीप भीमराव ायकवाड ३९ व खंडेश्वर भारत जिनेवाड २५ दोघेही रा. शहीद प्फुल्ल नगर आपघातातील गंभीर ाखमी संदीप भीमराव गायकवाड ास उपचारासाठी नांदेड येथे नेत ासतांना तो वाटेतच मरण पावला ावविच्छेदनानंतर दि. २७ रोजी त्याच्यावर अत्यसंस्कार करण्यात आले. दुसरा जखमी खंडेश्वर जिनेवाड याच्यावर प्राथमिक उपचारानंतर करून त्यास घरी पाठवले.

**भोकर पोलीसांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू**

भोकर शहरात जयंती मितवणुक असो वा मोर्चा दरवेळी उड्डाणपुलावरील वाहतुक बंद करण्यात येते परंतू रविवारी मिरवणुकीदरम्यान वाहतुक सुरु होती. याचवेळी पीकअप भरधाव वेगात येत असताना या पीकपच्या धडकेत महीला-मुले जखमी होतील या भीतीने संदीप गायकवाड यांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला परंतु या प्रयत्नात संदीप गायकवाड हा गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यु झाला. त्यामुळे हा अपघात पोलीसांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याची तक्रार मिरवणुकीतील सहभागींनी केली. त्यातच अपघात घडल्यानंतर पोलीसांनी दडपशाहीने मिरवणुकीत सहभागी असलेल्यांना हुसकावुन लावल्याचेही अनेकांनी सांगीतले.

# लोहा -कंधार विधानसभेतील शेतकऱ्यांसाठी तब्बल १३४ कोटी रुपयांचा पिक विमा मंजूर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २७ एप्रिल -**

यावर्षीच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड जिल्ह्यातील सर्वच भागातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. यात कंधार - लोहा मतदारसंघातील शेतकऱ्यांचा ही समावेश आहे. लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघातील तब्बल शेतकऱ्यांसाठी तब्बल १३४ कोटी ५८ लाख रुपयांचा पिक विमा मंजूर झाला आहे. हा पिक विमा मंजूर करण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे आ. चिखलीकर यांनी आभार मानले आहेत .

लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात यावर्षी झालेल्या खरीप हंगामात प्रचंड अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टी मध्ये ११ महसूल मधील शेतकऱ्यांना फटका बसला होता. पूर परिस्थिती इतकी भयाभय होती की, शेतामध्ये पिके राहिले नव्हते . अतिवृष्टीने जमिनी ही खरडून गेल्या होत्या . ही भयावह परिस्थिती आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी तत्कालीन परिस्थितीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत नेते अजित दादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना व्हिडिओ कॉल करून दाखवली होती. शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांना धीर देण्याचे कामही आ. चिखलीकर यांनी केले होते. त्यानंतर शेतकऱ्यांना पिक विमा मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

लोहा तालुक्यातील ७८,४९२ शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता तर कंधार तालुक्यातील ७९ हजार ६४७ शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता . या शेतकऱ्यांचा पिक विमा मंजूर झाला पाहिजे यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्याकडेही सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर या पाठपुराव्याला यश आले असून खरीप हंगाम २०२५ साठी लोहा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ७५ कोटी ९५ लाख रुपये तर कंधार तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ५८ कोटी ६३ लाख रुपये असा एकूण १३४ कोटी ५८ लाख रुपयांचा पिक विमा मंजूर झाला आहे. पिक विम्याच्या रकमा शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होत आहेत. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ७८ कोटी ९२ लक्ष रुपये जमा झाल्याची माहिती देण्यात आली आहे. उर्वरित पीक विमा येत्या दोन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल अशी माहिती आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे. अतिवृष्टीमध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केलेल्या प्रयत्नामुळे मतदार संघातील शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.